रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १९ ◆ अंक १८
www.ramprahar.com

◆ मंगळवार, ४ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

गारमाळ येथे कार झाडाला अडकल्याने अनर्थ टळला/२
रायगडच्या मातीत फुलला थायलंडचा जस्मिन राईस/५
बुमराहच्या जागी आकिब नबीला संधी/८

## इयत्ता अकरावी प्रवेशासाठी आजपासून विशेष फेरी



**मुंबई :** शैक्षणिक वर्ष २०२६-२७साठीच्या इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून सुमारे १२.९८ लाख विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत. अद्याप काही विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित न केल्याने त्यांच्यासाठी ४ ऑगस्टपासून विशेष फेरीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली. दरम्यान, इतर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज मागे घेण्याचे आवाहनही शिक्षण संचालनालयाने केले आहे. विद्यार्थी, पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी याची नोंद घ्यावी तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळ mahafyjcadmissions.in तसेच हेल्पलाइन क्रमांक ८५३०९५५५६४ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. **(सविस्तर २ वर..)**

# हर घर तिरंगा अभियान यशस्वी करा

## भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आवाहन; पनवेलमध्ये बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हर घर तिरंगा अभियान केवळ उपक्रम नसून प्रत्येक भारतीयाच्या हृदयात राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित करणारा राष्ट्रीय एकात्मतेचा उत्सव आहे. या अभियानाच्या प्रभावी आणि यशस्वी नियोजनासाठी भारतीय जनता पक्ष कोकण व ठाणे विभागाची बैठक पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि.३) पनवेल येथे पार पडली.




श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या नियोजन बैठकीला अभियान संयोजक तथा प्रदेश महामंत्री योगेश सागर, सहसंयोजक तथा प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे, चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी खासदार धैर्यशील पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, नगरसेवक सुमित झुंजारराव, विकास घरत, दिनेश खानावकर, पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ यांच्यासह कोकण व ठाणे विभागातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्तीचा संदेश प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहचावा आणि प्रत्येक घरावर अभिमानाने तिरंगा फडकावा या उद्देशाने या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

# राजिपच्या ५१ शाळा पनवेल मनपाकडे हस्तांतरित करण्याचा मार्ग मोकळा!

## सर्वसाधारण सभेत मंजुरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या ५१ शाळा पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याच्या प्रस्तावास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली. त्यामुळे या ५१ शाळा पनवेल मनपाकडे हस्तांतरित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा सोमवारी (दि. ३) परिषदेच्या कुंटेबाग येथील नवीन प्रशासकीय इमारतीमधील सभागृहात आयोजित करण्यात आली होती. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर सभेच्या अध्यक्षस्थानी होते. उपाध्यक्ष मधुकर पाटील, शिक्षण व अर्थ सभापती चंद्रकांत कळंबे, कृषी सभापती वैकुंठ पाटील, समाजकल्याण सभापती नारायण डामसे, महिला व बालकल्याण सभापती रसिका केणी, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

या सभेत रायगड जिल्हा परिषदेच्या ५१ शाळा पनवेल महापालिकेकडे हस्तांतरित करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. याबाबतचे आदेश शासनाने दिले आहेत. या शाळा हस्तांतरणानंतर पनवेल मनपा जिल्हा परिषदेला ५५ कोटी रुपये देणार आहे. **(पान २ वर..)**


## जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयासह भव्य मूट कोर्टचे उद्या उद्घाटन

### उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेलच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयासह भागूबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉच्या भव्य मूट कोर्टचा उद्घाटन समारंभ बुधवारी (दि. ५) सायंकाळी ४ वाजता खांदा कॉलनी येथे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर भूषविणार आहेत.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पेण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष





मंगेश वाकडीकर, महापौर नितीन पाटील तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख आदी मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेने शिक्षणाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य उभे केले असून उच्च शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यावर संस्थेचा सातत्याने भर राहिला आहे. **(पान २ वर..)**

## वॉटरफॉलच्या दरीत पडून तरुणाचा मृत्यू

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीजवळील केपी वॉटरफॉल परिसरातील दरीत पडून ठाणे येथील अभिषेक कुशवाह (२३) या तरुणाचा मृत्यू झाला. अंधार, मुसळधार पाऊस आणि अतिशय कठीण भौगोलिक परिस्थितीत ठाकूरवाडीतील युवक, हेल्प फाउंडेशन व खोपोली पोलिसांनी रात्रभर शोधमोहीम राबवून पहाटे त्याचा मृतदेह बाहेर काढला.

ठाण्याहून अभिषेक कुशवाह व त्याचे तीन मित्र रविवारी (दि.२) सायंकाळी केपी वॉटरफॉल परिसरात आले होते. सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास अभिषेकचा पाय घसरून तो खोल दरीत पडला. मित्रांनी ठाकूरवाडीतील युवकांकडे धाव घेतल्यानंतर पोलिसांना कल्पना देऊन मदतकार्य सुरू करण्यात आले. अखेर पहाटे दरीत अभिषेकचा मृतदेह आढळून आला. दोरखंड व स्ट्रेचरच्या साहाय्याने तो बाहेर काढून पुढील कार्यवाही करण्यात आली.

# मराठी संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहचवणे आवश्यक -लोकनेते रामशेठ ठाकूर

## पालेखुर्द येथील जि.प. शाळेच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राची मराठी संस्कृती अत्यंत समृद्ध आणि महान असून ती जपणे तसेच पुढील पिढीपर्यंत पोहचवणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. मराठी भाषेत शिक्षण घेऊनही आयुष्यात उत्तम यश संपादन करता येते, असा विश्वास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पालेखुर्द येथील रायगड जिल्हा परिषद शाळेच्या नूतन इमारत उद्घाटन सोहळ्यावेळी व्यक्त केला तसेच ग्रामस्थांना व शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.



दीपक फर्टिलायझर अँड केमिकल्स कॉर्पोरेशन लि.च्या सीएसआरएफ उपक्रमांतर्गत आणि ईशान्य फाउंडेशनच्या सहकार्यातून पालेखुर्द येथील जि.प. शाळेची सुसज्ज नूतन इमारत उभारण्यात आली आहे. भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या इमारतीचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. **(पान २ वर..)**



# इयत्ता अकरावी प्रवेशासाठी आजपासून विशेष फेरी

## विद्यार्थ्यांनी अर्ज लॉक करण्याचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून सुमारे १२.९८ लाख विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत. अद्याप काही विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित न केल्याने त्यांच्यासाठी ४ ऑगस्ट २०२६ पासून विशेष फेरीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर




यांनी दिली आहे.

विशेष फेरीअंतर्गत विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने किमान १० कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरून अर्ज लॉक करणे आवश्यक राहणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीक्रम आणि गुणवत्तेनुसार कनिष्ठ महाविद्यालयांचे वाटप करण्यात येणार आहे. या विशेष फेरीसाठी नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी तसेच भाग-१ मधील आवश्यक दुरुस्ती करण्याची सुविधा ४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत उपलब्ध राहील. याच कालावधीत विद्यार्थ्यांना पसंतीक्रम भरून अर्ज अंतिम स्वरूपात लॉक करता येणार आहे.


विशेष फेरीतील प्रवेश वाटप प्रक्रिया ७ ऑगस्ट रोजी पार पडणार असून ८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता प्रवेश वाटपाची यादी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारेही माहिती पाठविण्यात येणार आहे. प्रवेश वाटप झालेल्या विद्यार्थ्यांना ८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजल्यापासून १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात आवश्यक कागदपत्र पडताळणी करून प्रवेश निश्चित करता येईल. त्यानंतर ११ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

दरम्यान, इतर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी आपला अर्ज मागे घेण्याचे आवाहनही शिक्षण संचालनालयाने केले आहे. विद्यार्थी, पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी याची नोंद घ्यावी, तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळ mahafyjcadmissions.in तसेच हेल्पलाईन क्रमांक ८५३०९५५५६४ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पर्यटनाला ऑनलाईन फसवणुकीचा विळखा

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

पावसाळी पर्यटनासाठी दरवर्षी मुंबई, पुणे तसेच राज्याच्या विविध भागांतून हजारो पर्यटक कर्जतमध्ये दाखल होत असतात. मात्र, वाढत्या पर्यटनाचा गैरफायदा घेत ऑनलाइन रिसॉर्ट बुकिंगच्या नावाखाली पर्यटकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्याने गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, कर्जत, लोणावळा आणि खोपोली परिसरातील अनेक रिसॉर्ट व फार्महाऊसच्या नावाने सोशल मीडियावर बनावट पेज तयार करून काही भामटे पर्यटकांकडून आगाऊ रक्कम उकळत आहेत. आकर्षक सवलती, कमी दरात लक्झरी रिसॉर्टचे आमिष आणि खोट्या एजंटांच्या माध्यमातून पर्यटकांना जाळ्यात ओढले जाते. पैसे जमा झाल्यानंतर संबंधित व्यक्ती मोबाईल बंद करून किंवा संपर्क तोडून गायब होत असल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत.

अलीकडेच एका पर्यटकांन त्यांच्यासोबत अशाच प्रकारची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. त्यांनी संबंधित संभाषणाचे स्क्रीनशॉट आणि इतर पुरावे समाजमाध्यमांवर शेअर करत इतर पर्यटकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

या प्रकारांची गंभीर दखल घेत कर्जत भूमिपुत्र फार्म मालक संघटनेने समाजमाध्यमांवर जनजागृती मोहीम सुरू केली आहे. पर्यटकांनी कोणतेही ऑनलाइन बुकिंग करण्यापूर्वी संबंधित रिसॉर्ट किंवा फार्महाऊसच्या मालकाशी थेट संपर्क साधावा, यूपीआय आयडी व बँक खात्याची पडताळणी करावी, प्रॉपर्टीचे लाइव्ह लोकेशन किंवा व्हिडिओ कॉलद्वारे खात्री करूनच आगाऊ रक्कम भरावी, असे आवाहन संघटनेने केले आहे.

कर्जतमधील बहुतांश रिसॉर्ट आणि फार्महाऊस फुल बुक होतात. याच संधीचा गैरफायदा घेत काही फसवणूक करणारे बनावट बुकिंगच्या माध्यमातून पर्यटकांना गंडा घालत आहेत. त्यामुळे पर्यटकांनी कोणत्याही आकर्षक ऑफरला भुलू नये. संबंधित मालकाशी थेट संपर्क साधून सर्व माहितीची शहानिशा केल्यानंतरच बुकिंग करावे. संशयास्पद व्यवहार आढळल्यास तातडीने पोलिसांकडे तक्रार करावी.पर्यटनस्थळांची वाढती लोकप्रियता आणि डिजिटल व्यवहारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता, पर्यटकांनी सोशल मीडियावरील जाहिरातींवर आंधळा विश्वास न ठेवता अधिकृत माध्यमातूनच बुकिंग करणे, व्यवहारापूर्वी सर्व माहितीची खातरजमा करणे आवश्यक आहे.

## कळंबोलीत आज वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना कळंबोली शहराच्या वतीने मंगळवार, ४ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता नवीन सुधागड हायस्कूल, कळंबोली येथे शालेय साहित्य वाटप, वृक्षदिंडी आणि वृक्षारोपण या समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शहरप्रमुख तुकाराम सरक आणि नगरसेविका सायली सरक यांच्या पुढाकारातून हा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येणार आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ, बॅनर आणि जाहिरातबाजी टाळून सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याचे आवाहन कार्यकर्ते, समर्थक तसेच विविध सामाजिक संस्थांना केले होते. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत शिवसेना कळंबोली शहरप्रमुख तुकाराम सरक आणि नगरसेविका सायली सरक यांच्या वतीने कळंबोली येथे वृक्षदिंडी, वृक्षारोपण आणि शालेय साहित्य वाटप या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे हा आहे. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याची भावना जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला बळ देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाचा प्रवास अधिक सुलभ करण्याचा आयोजकांचा मानस आहे.

यासोबतच पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षदिंडी काढण्यात येणार असून त्यानंतर वृक्षारोपणाचा कार्यक्रम होणार आहे. खासदार श्रीरंग बारणे आणि शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक रामदास शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर दरोडेखोरांचा धुमाकूळ

**पनवेल : वार्ताहर**

देशातील सर्वाधिक सुरक्षित आणि वेगवान महामार्गांपैकी एक मानल्या जाणाऱ्या मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर दरोडेखोरांच्या टोळ्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातल्याचे चित्र समोर येत आहे. रात्रीच्या वेळी वाहनांवर दगडफेक करून ती थांबवणे, चालकांना मारहाण करून रोख रक्कम, सोन्याचे दागिने, मोबाइल आणि इतर मौल्यवान वस्तू लुटून पसार होणे अशा घटनांमध्ये वाढ झाल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेषतः कळंबोली सर्कल ते खालापूर टोलनाका आणि खालापूर ते कळंबोली या संपूर्ण पट्ट्यात अशा घटनांचे प्रमाण वाढल्याने अनेक वाहनचालकांनी या मार्गाला 'चोरीचा महामार्ग' अशी उपमा दिली आहे. वाहनचालकांच्या माहितीनुसार अमिटी विद्यापीठ परिसर, भाताण बोगदा आणि कोन गाव एक्झिट ही दरोडेखोरांच्या हालचालींची प्रमुख ठिकाणे बनली आहेत. रात्री उशिरा किंवा पहाटे वाहतूक कमी होताच टोळ्या सक्रिय होतात. मालवाहू ट्रक, कंटेनर, खासगी चारचाकी तसेच व्यावसायिक वाहने हेरून त्यांच्यावर अचानक दगडफेक केली जाते.

वाहनाच्या काचा फुटल्यानंतर किंवा चालक घाबरून वाहन थांबवताच चार ते सहा जणांची टोळी वाहनात घुसून चालकाला मारहाण करते. त्यानंतर गळ्यातील सोन्याचे दागिने, रोख रक्कम, मोबाइल आणि इतर मौल्यवान वस्तू लुटून आरोपी सेवा रस्ते किंवा झाडीचा आधार घेत काही मिनिटांत पसार होतात. या प्रकारात अनेक चालक जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. आरोपी घटनास्थळावरून झटपट पसार होत असल्याने त्यांचा माग काढणे पोलिसांसमोरही मोठे आव्हान ठरत आहे.

अलीकडेच भाताण बोगद्याजवळ अशीच एक घटना घडली. पुण्यातून ट्रक घेऊन मुंबईकडे निघालेल्या अर्जुन यादव यांच्या वाहनावर अज्ञातांनी दगडफेक केली. दगड त्यांच्या हाताला आणि गालाला लागल्याने त्यांनी वाहन थांबवले. त्याच क्षणी चार अज्ञात व्यक्ती ट्रकमध्ये घुसल्या. त्यांनी यादव यांना मारहाण करून त्यांच्याकडील सुमारे पाच हजार रुपये रोख, सोन्याची बाली आणि इतर वस्तू लुटून पलायन केले. घटनेनंतर चालकाने पोलिसांशी संपर्क साधला, मात्र घटनास्थळ कोणत्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत येते याची पडताळणी करून पुढील कारवाई करण्यात येईल, असे सांगण्यात आल्याची माहिती चालकाने दिली.

गस्त वाढविण्याची मागणी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अमिटी विद्यापीठ, खालापूर टोलनाका, भाताण बोगदा आणि कोन गाव एक्झिट परिसरात डिझेल चोरी, दरोडे आणि लुटमारीच्या घटना वारंवार घडत असल्याचा आरोप ट्रान्सपोर्ट व्यावसायिक तुकाराम सरक यांनी केला आहे. या ठिकाणी स्थानिक पोलिसांनी नियमित गस्त वाढवून दरोडेखोरांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यामुळे वाहनचालकांमध्ये निर्माण झालेली भीती कमी होऊन महामार्गावरील सुरक्षा अधिक बळकट होईल, असेही ते म्हणाले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत सलग पाच विद्युत खांब कोसळले; बल्लाळेश्वर मंदिर परिसर हादरला

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पालीतील श्री बल्लाळेश्वर गणपती मंदिर परिसरात सोमवारी (दि.३) सकाळी सुमारे ८.०० ते ८.३० वाजण्याच्या दरम्यान घडलेल्या धक्कादायक घटनेत अज्ञात वाहनाच्या जोरदार धडकेमुळे एक विद्युत खांब कोसळला आणि त्यानंतर डोमिनो परिणाम होऊन सलग पाच विद्युत खांब जमिनीवर कोसळले. सुदैवाने सकाळची वेळ असल्याने रस्त्यावर वर्दळ कमी होती. त्यामुळे मोठी



जीवितहानी टळली. मात्र हीच घटना दुपारच्या गर्दीच्या वेळी घडली असती, तर भीषण दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता आली नसती.

ही घटना बल्लाळेश्वर गणपती मंदिराच्या प्रवेशद्वारापासून भक्तनिवासापर्यंतच्या मार्गावर घडली. खांब कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मंदिर परिसरात ये-जा करणाऱ्या भाविकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.घटनेची माहिती मिळताच पाली नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पराग मेहता यांनी तात्काळ महावितरण (एमएसईबी) अधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली व आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

त्यानंतर महावितरणचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून तात्काळ वीजपुरवठा खंडित करण्यात आला आणि कोसळलेले खांब हटविण्याचे तसेच विद्युत यंत्रणा पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले.दरम्यान, या अपघातास कारणीभूत ठरलेल्या अज्ञात वाहनाचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू करण्यात आली आहे.

# सोलनपाडा धरणाच्या खाली मौजमजा करणाऱ्या पर्यटकाचा मृत्यू



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सोलनपाडा येथील पाझर तलावावर वर्षसहलीसाठी आलेल्या मुंबई येथील ग्रुप सोबत आलेल्या पर्यटकांचा नाल्याच्या पाण्यात वाहून जाऊन मृत्यू झाला.

या तरुणाने धरणाच्या खाली असलेल्या धबधब्याच्या पाण्यात उडी मारली आणि तो नंतर दिसेनासा झाला. त्यानंतर या तरुणाचा स्थानिक ग्रामस्थांनी शोध घेतला असता नाल्याच्या पुलाला अडकून पडला होता. त्या तरुणाला पाण्यातून बाहेर काढण्यात आले. मात्र त्या तरुणाचा मृत्यू झाला होता. दरम्यान धरणावर जाण्यास बंदी असताना देखील पर्यटक येत असल्याने स्थानिक ग्रामस्थांनी आता सर्वांना धरणावर जाण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.

कर्जत तालुक्यातील सोलनपाडा या पाझर तलावावर मूळचा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील असलेला आणि सध्या मुंबईत राहणारा तरुण आपल्या मित्रांसह वर्षसहलीसाठी आला होता. हे तरुण सकाळी सोलनपाडा पोहचले आणि तेथे धरणाच्या खाली तयार झालेल्या धबधबा येथे पाण्यात उड्या मारून पोहण्याचा आनंद घेत होते. यामधील अरमान अब्दुल लतीफ अन्सारी या २४ वर्षीय तरुणाने धबधब्याचे भिंती वरून पाण्यात उडी घेतली आणि खोल पाण्यात दिसेनासा झाला. पोहण्याचा आनंद घेता घेता पाणी अडवण्यासाठी बांधलेले बंधाऱ्यांवरून पर्यटकांना पोहण्याचा आनंद घेण्यासाठी उडी मारली असता पर्यटकाच्या डोक्याला आणि हनुवटीवर दगडांचा मार लागल्याने पर्यटकाचा जागीच मृत्यू झाला असल्याचे बोलले जात आहे. मृत्युमुखी पडलेला तरुण मुंबई वडाळा येथील रहिवाशी आहे.

**पान १ वरुन**

## राजिपच्या ५१ शाळा पनवेल मनपाकडे हस्तांतरित करण्याचा मार्ग मोकळा!

याचबरोबर ५१ शाळांमधील ६१ शिक्षक हे रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील शाळांमध्ये नियुक्त करण्यात येणार आहेत, अशी माहिती शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे यांनी सभागृहाला दिली.

या शाळा हस्तांतरित करताना शाळा इमारतीचा व भूखंडाचा वापर शैक्षणिक कामासाठीच करण्यात यावा. व्यावसायिक वापरासाठी करू नये, अशी अट करारात घालण्यात यावी, अशी सूचना काही सदस्यांनी केली. या सूचनांचा विचार केला जाईल, असे आश्वासन अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी दिले. त्यानंतर हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागा व इमारती हस्तांतरित करण्याचा विषयदेखील चर्चेत आला. या जागा खासगी लोकांना देऊ नये. जागा किंवा इमारत भाड्याने देताना मालकी जिल्हा परिषदेकडे राहील असा करार करावा. नाममात्र भाडे आकारावे, अशी सूचना मानसी दळवी यांनी केली. हाशिवरे येथील शाळा खासगी संस्थेत हस्तांतरित करण्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आल्याचे अमित नाईक यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

जलजीवन योजनांची कामे अपूर्ण असताना संबंधित ठेकेदारांना बिल देण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. ठेकेदारांची मीटिंग घेऊन त्यांना सूचना दिल्या जातील. जे अधिकारी व ठेकेदार दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी सांगितले.

सभागृहात होत असलेल्या गोंधळाबाबत विकास गोगावले यांनी नाराजी व्यक्त केली. सभेच्या आठ दिवस आधी लेखी प्रश्न द्यावेत, अशी सूचना त्यांनी केली.

सदस्यांनी महत्त्वाच्या विषयांवर बोलावे. आपल्या ग्रामपंचायतींचे प्रश्न न मांडता जिल्ह्याच्या विषयावर चर्चा घडवून आणावी. आपले प्रश्न लेखी स्वरुपात सभेच्या आठ दिवस अगोदर द्यावे, म्हणजे त्यावर चर्चा करून निर्णय घेणे सोपे होईल, असे अध्यक्ष मंगेश वाकडीकर व उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी सदस्यांना सांगितले.

बांधकामांबाबत ग्रामपंचायतीचे अधिकार, इतिवृत्त उशिरा दिले जाणे, आदर्श व अत्याधुनिक शाळा तयार करण्यासाठी सॉफ्टवेअर पुरविणे, नादुरूस्त शाळा इमारती, जिल्हा परिषदेच्या जागा भाड्याने देणे आदी विषयांवर या सभेत चर्चा करण्यात आली.

## जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयासह भव्य मूट कोर्टचे उद्या उद्घाटन

संस्थेने १९९२मध्ये आपल्या शैक्षणिक कार्याची सुरुवात केली असून आज विविध शैक्षणिक शाखांच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रसार केला जात आहे. भागूबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ हे संस्थेच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पाऊल असून कायद्याच्या विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, त्यांच्या व्यावहारिक ज्ञानात भर पडावी आणि भविष्यातील कायदेपेशासाठी त्यांची सक्षम तयारी व्हावी या उद्देशाने मूट कोर्टसारख्या आधुनिक सुविधेला महत्त्व आहे.

भागूबाई चांगू ठाकूर लॉ कॉलेजची स्थापना शैक्षणिक वर्ष २००९-१०मध्ये करण्यात आली असून ते मुंबई विद्यापीठाशी संलग्न आणि बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या मान्यतेखाली कार्यरत आहे. हितचिंतक नागरिक, पालकांनी या सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे आणि संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य नगरसेवक परेश ठाकूर यांनी केले आहे.

## मराठी संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहचवणे आवश्यक -लोकनेते रामशेठ ठाकूर

उत्तर रायगड जिल्हा भाजप सदस्य तथा माजी नगरसेविका अरुणा किरण दाभणे यांच्या पुढाकारातून आणि संयोजनातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि अत्याधुनिक सुविधांसह प्राथमिक शिक्षण मिळावे या उद्देशाने ही इमारत उभारण्यात आली आहे.

उद्घाटन समारंभास आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, एकनाथ देशेकर, जिल्हा परिषद सदस्य कमला देशेकर, पंचायत समिती सदस्य आरती काठे, नगरसेवक गणेश कडू, नितेश पाटील, दिनेश खानावकर, नगरसेविका शीला भगत, सरस्वती काथारा, विजयश्री पाटील, संतोष पाटील, नंदू म्हात्रे, महेश पाटील, प्रकाश खैरे, कृष्णा पाटील, शैलेश माळी, शिवाजी दुर्गे, लहू ढोंगरे, अंकुश वाघ, संदीप दाभणे, शशिकांत गोंधळी, नरेश सोनावणे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या नूतन शाळा इमारतीमुळे पालेखुर्द परिसरातील शैक्षणिक वाटचालीस अधिक गती मिळणार आहे.



## मुंबई मराठी पत्रकार संघाच्या क्रीडा पुरस्कारांची घोषणा

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वतीने क्रीडा पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पत्रकारांना दरवर्षी प्रदान करण्यात येणाऱ्या क्रीडा पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.

यंदा २०२५ आणि २०२६ या दोन वर्षांसाठी ज्येष्ठ आणि युवा अशा दोन गटांतील चार पत्रकारांची पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली आहे. कै. महेश बोभाटे ज्येष्ठ क्रीडा पत्रकार पुरस्कार २०२५ ज्येष्ठ क्रीडा पत्रकार रणजित दळवी यांना, तर २०२६ चा पुरस्कार सुनील लवाटे यांना जाहीर करण्यात आला आहे. युवा क्रीडा पत्रकारांच्या उल्लेखनीय कामगिरीसाठी देण्यात येणारा कै. आत्माराम मोरे युवा क्रीडा पत्रकार पुरस्कार २०२५ बीबीसीच्या जान्हवी मुळे यांना, तर २०२६चा पुरस्कार स्वदेश घाणेकर यांना जाहीर करण्यात आला आहे.

प्रत्येक पुरस्काराचे स्वरूप रुपये १० हजार रोख, गौरवचिन्ह आणि सन्मानपत्र असे आहे अशी माहिती पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिली. मुंबई मराठी पत्रकार संघाला ८४ वर्षांची समृद्ध परंपरा असून पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्याची परंपरा संघाने सातत्याने जपली आहे. त्याचाच एक भाग म्हणून क्रीडा पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाची दखल घेण्यासाठी संघातर्फे क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यंदाचे हे नववे वर्ष आहे. पुरस्कार विजेत्यांचा मुंबई मराठी पत्रकार संघाच्या विशेष क्रीडा पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.

# रोडपालीत महिलांना भाकरी मशिनचे वाटप

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सरकार सातत्याने पुढाकार घेत असून आपल्या परिसरात अनेक नवीन उद्योग व प्रकल्प सुरू होत आहेत. त्यामुळे रोजगाराच्या अनेक नवीन संधी निर्माण होत आहेत. त्या पार्शवभूमीवर येणाऱ्या काळात जास्तीत जास्त महिलांना स्वयंरोजगारासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही भारतीय जनता पार्टीचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली. तसेच आपल्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवून शुभेच्छा आणि आशीर्वाद दिल्याबद्दल त्यांनी उपस्थितांचे मनापासून आभार मानले. चार शब्द बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि हे काम प्रभुदास भोईर यांनी केले त्याबद्दल त्यांचेही त्यांनी आभार मानले.



भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रभाग क्रमांक ९ मधील ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी भाकरी बनवण्याच्या मशिनचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम रविवारी रोडपाली येथील आंबेडकर भवन येथे अत्यंत उत्साहात पार पडला. महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे प्रदेश अध्यक्ष प्रभुदास भोईर यांच्या वतीने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ५० भाकरी बनवण्याच्या मशिनचे वाटप करण्यात आले. या अभिनव उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या रोजगाराचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणाऱ्या या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून आणि महिलावर्गाकडून जोरदार स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम, कळंबोली मंडळ अध्यक्ष तथा नगरसवेक अमर पाटील, शशिकांत शेलके, राजू शर्मा, रवि भगत, नगरसेविका सरस्वती कथारा, प्रतिभा भोईर, दमयंती भोईर, भाजप नेते सुरेशशेठ भोईर, शंकुनाथ भोईर, सचिन चौधरी, अनिल शुक्ला, जाखिर खान, सौरभ सक्सेना, निलेश भोईर, मधुर बजाज, भूषण म्हात्रे, कमलाकर भोईर, विष्णू भोईर, चंद्रकांत भोईर, श्यामा भोईर, मधुकर गोंधली, लक्ष्मण ठाकूर, सखाराम उलवेकर, मिननाथ भोईर, कमलाकर भोईर, अमर उलवेकर, मोहन वास्कर, दादा भोईर, राम ठाकूर, कैलास भोईर, प्रभाकर उलवेकर, मनोज उलवेकर, बाल्या भोईर, शंकर भोईर, धनंजय भोईर, अंकुश भोईर आदी उपस्थित होते.

## हर घर तिरंगा अभियानासाठी भाजयुमो उत्तर रायगडची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा उत्तर रायगडच्या वतीने हर घर तिरंगा अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी रविवारी (दि. २) बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली.

बैठकीदरम्यान पक्षाच्या संघटनात्मक वाढीसाठी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्ह्याच्या नवीन पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली. यामध्ये सरचिटणीसपदी अक्षय सिंह व मनोज पार्टे, तर जिल्हा उपाध्यक्षपदी खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांची निवड जाहीर करण्यात आली. आमदार प्रशांत ठाकूर आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

बैठकीला भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, नगरसेवक समीर कदम, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.




## जि.प. सदस्य कमला देशेकर यांच्या पुढाकारातून पाटीलवाडी रस्त्याचे काम सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे आणि रायगड जिल्हा परिषद सदस्या कमला एकनाथ देशेकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पाटीलवाडी येथील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामाला तत्काळ सुरुवात झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पाटीलवाडी परिसरातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालकांना आणि नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

स्थानिकांच्या तक्रारींची दखल घेत ही दुरुस्ती मोहीम हाती घेण्यात आली. या कामाबरोबरच लवकरच या रस्त्याच्या काँक्रीटीकरणालाही सुरुवात होणार आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण होणार आहे. काँक्रीट रस्ता झाल्यानंतर वाहतूक अधिक सुरक्षित, सुलभ आणि सुरळीत होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे.

या विकासकामासाठी सहकार्य करणारे आमदार प्रशांत ठाकूर तसेच संबंधित प्रशासनाचे स्थानिकांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.



## ‘संकल्प’च्या वेबसाइटचे राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षण, समाजसेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम घडविणाऱ्या संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या अधिकृत वेबसाइटचे उद्घाटन रविवारी (दि. २) पनवेल येथील विरूपाक्ष सभागृहात पार पडले. महाराष्ट्राच्या राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत या वेबसाइटचे लोकार्पण करण्यात आले.



वेबसाइटच्या उद्घाटनप्रसंगी राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी संस्थेच्या कार्याचे विशेष कौतुक करत समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिक्षण आणि सामाजिक संवेदनशीलता पोहोचविण्याचे कार्य अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगितले, तर आमदार प्रशांत ठाकूर यांनीही संकल्प संस्थेने उभारलेली सामाजिक चळवळ कौतुकास्पद असल्याचे सांगत शिक्षणासोबत समाजातील वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविणारे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबवावेत, अशा शुभेच्छा दिल्या.

यावेळी महापौर नितीन पाटील, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, अभिनेते पुष्कर श्रोत्री, पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उमा पारवे, ज्योती सोनार, संगीता कुंभार, सुनंदा गरड, स्वप्नील पाटील, प्रणव काळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पोयंजे परिसरातील शाळांमध्ये वह्यावाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त सोमवारी (दि. ३) रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या वतीने आणि भारतीय जनता पक्ष पोयंजे -मोहोपे यांच्या माध्यमातून मोफत वह्यावाटपाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला. राजिप शाळा पालिवाडी, राजिप शाळा पोयंजेवाडी आणि पोयंजे हायस्कूल या शाळांमध्ये हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजप पनवेल तालुका माजी अध्यक्ष तानाजी खंडागळे, उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, उपसरपंच प्रवीण भोईर, माजी अध्यक्ष प्रवीण ठाकूर, पोयंजे पं.स. अध्यक्ष रवींद्र गायकवाड, युवा कार्यकर्ता रमेश भोईर, बूथ अध्यक्ष सूरज पवार, युवा कार्यकर्ता राजेश चव्हाण, मंदार कडव, रसिक मते, सामाजिक कार्यकर्ते सुबोध जाधव, शालेय शिक्षक व मुख्याध्यापकवृंद पालीवाडी शाळा, मुख्याध्यापक मोकल आणि शिक्षिका राजश्री मोकल पोयंजेवाडी शाळेच्या, मुख्याध्यापिका बबिता मॅडम व सहशिक्षक पोयंजे हायस्कूल मुख्याध्यापक ठाकूर व इतर शिक्षक धम्मानंद वाघमारे, सुभाष ढवळे, मनीषा पवार, अस्मिता साळुंखे, तनुजा खाडे, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## नवीन पनवेलमध्ये ‘आनंदगाणी’

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने नवीन पनवेल सेक्टर ५ येथे आनंदगाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संगीत शिक्षिका वंदना सहस्त्रबुद्धे आणि प्रतिभा कुलकर्णी यांच्या परिसरातील शिष्यवर्गाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमाला ज्येष्ठ संगीतगुरू वंदना सहस्त्रबुद्धे, प्रतिभा कुलकर्णी, ब्राह्मण सभा नवीन पनवेलच्या अध्यक्ष दीपाली जोशी, सदस्या मंजुषा भावे आदी उपस्थित होते. प्रारंभी गुरूंचे पूजन करण्यात आले. नंतर कार्यक्रमाचा प्रारंभ गणेशवंदना आणि गुरुभक्तिपर गीतांनी करण्यात आला. त्यानंतर विविध मराठी, हिंदी भक्तिगीते, भावगीते, अभंग, भारुड आणि कराओके अशा विविध गायन प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. गंधार देशपांडे यांनी सिंथेसायजर व माधव भागवत यांनी तबलासाथ केली. वरदा जोशी आणि समीर सोमण यांनी निवेदनाद्वारे कार्यक्रमाची रंगत वाढवली. मृणाल भागवत हिने तंत्रसहाय्य केले. पद्मनाभ व मुग्धा भागवत यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.



## पनवेल मनपात लोकशाही दिनानिमित्त नागरिकांच्या तक्रारींचे निवारण




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये सोमवारी (दि. ३) आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त मंगला माळवे, शहर अभियंता राजेश कर्डिले, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख कीर्ती महाजन, जन्ममृत्यू विभाग प्रमुख शुभांगी पांगारे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विविध विभागातील एकूण चार अर्ज दाखल झाले होते. त्या अर्जांची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या.

महापालिकेत दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे १५ दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित राहावे, असे कळविण्यात आले आहे.

## नानासाहेब बुधे यांचा सेवानिवृत्ती आणि अभीष्टचिंतन सोहळा







**कामोठे : रामप्रहर वृत्त**

नालंदा एज्युकेशनल फाऊंडेशन संचलित चेंबूर (मुंबई) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर हास्कूल व ज्युनिअर कॉलेजचे सहाय्यक शिक्षक नानासाहेब बुधे २९ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाले. त्यांचा सेवानिवृत्ती तसेच अभीष्टचिंतन समारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत कामोठे येथे झाला.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बोलताना सांगितले की, राजमाता अहिल्यादेवी सेवा संस्थेचे सल्लागार असलेले नानासाहेब बुधे व कुटुंबीय गेली कित्येक वर्षे कुठलीही अपेक्षा न ठेवता आमच्यासोबत खंबीरपणे राहिले. बुधे सर शाळेतून रिटायर झाले असले तरी ते आमच्या मनातून रिटायर होणार नाही. आमदार प्रशांत ठाकूर यांनीही बुधे यांना शुभेच्छा दिल्या.

सुषमा पाटील विद्यालयात झालेल्या या कार्यक्रमास सांगली जिल्हा माजी समाज कल्याण सभापती ब्रह्मानंद पडळकर, डीडीएसआरचे संस्थापक राहुल हजारे, स्थानिक नगरसेवक रामदास शेवाळे, कामोठे मंडळ अध्यक्ष व नगरसेवक विकास घरत, रवींद्र जोशी, नगरसेविका मोनिका महानवर, आटपाडी पंचायत समितीचे माजी सभापती जयवंत सरगर, कळंबोली शहराचे शिवसेना नेते तुकाराम सरक, धनगर समाजाचे नेते अशोक मोठे, माजी नगरसेवक शंकरशेठ विरकर, नारायण खर्जे, आटपाडी तालुका युवा मोर्चाचे अध्यक्ष आबासाहेब गलांडे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नानासाहेब मगदूम आदी उपस्थित होते.

कामोठे शहर युवा मोर्चा उपाध्यक्ष राहुल बुधे यांनी प्रास्ताविक केले. राजमाता अहिल्यादेवी सेवा संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब बुधे यांनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला त्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

## पनवेल मनपा मुख्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील जयंतीनिमित्त अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील थोर क्रांतिकारक, प्रतिसरकारचे संस्थापक आणि शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि. ३) पनवेल महानगरपालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी आयुक्त मंगेश चितळे, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, शहर अभियंता राजेश कर्डिले, उपायुक्त स्वरूप खारगे, सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे, उपसचिव अक्षय कदम, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख कीर्ती महाजन तसेच महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

क्रांतिसिंह नाना पाटील यांचे राष्ट्रसेवा व लोकशाही मूल्यांप्रति असलेले योगदान आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या विचारांचा आदर्श समाजाने जपावा, असे मत मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.



## संपादकीय

# दबावाला लगाम

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी मिळाल्यानंतर राज्यात 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा २०२६' लागू झाला आहे. बळजबरी, फसवणूक, प्रलोभन किंवा दबाव टाकून होणाऱ्या धर्मांतराला आळा घालण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने हा कायदा आणला असून धर्मांतर बळजबरीने झालेले नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवर असणार आहे.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघासह इतर हिंदुत्ववादी संघटनांनी गेल्या अनेक वर्षांपासून आदिवासी भागांमध्ये प्रलोभने, आर्थिक मदत, फसवणूक किंवा दबावाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर धर्मांतरे होत असल्याचा मुद्दा सातत्याने उपस्थित केला होता. राज्यात मध्यंतरीच्या काळात लव्ह जिहाद त्याचप्रमाणे ग्रामीण भागात आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना प्रलोभने दाखवून धर्मांतर करण्यास भाग पाडले जात असल्याच्या घटना उघडकीस आल्या होत्या. गरीब आणि वंचित समाजघटकांना शिक्षण, आरोग्य किंवा आर्थिक मदतीचे आमिष दाखवून धर्मांतर घडवून आणले जात असल्याने अशा प्रकारांना कायदेशीर लगाम आवश्यक होता. राज्य सरकारने संबंधित वास्तवाची दखल घेत धर्मस्वातंत्र्य कायदा आणण्याचा निर्णय घेतला. बेकायदेशीर धर्मांतरापासून नागरिकांचे रक्षण करण्यासाठी राज्य सरकारने तयार केलेल्या 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६'ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आता मंजुरी दिली आहे. राज्याच्या कायदेविषयक इतिहासातील हा महत्त्वाचा टप्पा असून समाजातील दुर्बल घटकांच्या धार्मिक स्वातंत्र्याचे संरक्षण करणे हा या कायद्यामागील मूलभूत हेतू आहे. हे विधेयक कुठल्याही एका धर्माविरोधात नसून ते सगळ्या धर्मांना लागू आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मार्च महिन्यात राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात हे विधेयक मंजूर झाले त्यावेळी म्हटले होते. कायद्यात बळजबरी, फसवणूक, खोटी माहिती, अवास्तव प्रलोभन, अनुचित प्रभाव किंवा दबावाद्वारे करण्यात आलेले धर्मांतर बेकायदेशीर ठरविण्यात आले आहे. असे धर्मांतर करणे हा या नव्या कायद्यानुसार गंभीर आणि अजामीनपात्र गुन्हा आहे. अशा प्रकरणांमध्ये दोषी आढळल्यास धर्मांतर करणाऱ्यांना दहा वर्षांपर्यंत कारावास आणि सात लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची कठोर तरतूद करण्यात आली आहे. महिला, अल्पवयीन, अनुसूचित जाती-जमातीतील व्यक्ती किंवा सामूहिक धर्मांतराच्या प्रकरणांमध्ये अधिक कठोर शिक्षेची व्यवस्था आहे. धर्मांतरापूर्वी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पूर्वसूचना देणे तसेच धर्मांतरानंतर आवश्यक घोषणा सादर करणे यांसारख्या प्रक्रियात्मक तरतुदीही कायद्यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. काही परिस्थितींमध्ये धर्मांतराच्या उद्देशाने केलेल्या विवाहांना न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकते. महाराष्ट्र हा असा कायदा करणारे पहिले राज्य नाही. यापूर्वी ओडिशा, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, गुजरात, अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटक आदी राज्यांनी अशा स्वरूपाचे कायदे लागू केले आहेत. या राज्यांचा अनुभव लक्षात घेऊन महाराष्ट्रानेही स्वतःच्या गरजांनुसार कायद्याची रचना केली आहे. प्रत्येक नागरिकाला आपल्या श्रद्धेनुसार धर्म स्वीकारण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र ते पूर्णपणे स्वेच्छेने आणि कोणत्याही स्वरूपाच्या दबावाशिवाय असले पाहिजे असा दृष्टिकोन या कायद्यामागे आहे. या कायद्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे अशी टीका विरोधकांकडून केली जाते. मात्र सरकारचे स्पष्ट म्हणणे आहे की हा कायदा केवळ बेकायदेशीर आणि सक्तीच्या धर्मांतराविरोधात आहे. स्वेच्छेने धर्म स्वीकारण्याच्या घटनात्मक अधिकाराला धक्का न लावता फसवणूक आणि दबावाला आळा घालणे हेच त्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे धार्मिक स्वातंत्र्य आणि सामाजिक सुव्यवस्था यांच्यात समतोल राखण्याचा प्रयत्न म्हणून या कायद्याकडे पाहिले पाहिजे.**

# निरोगी महाराष्ट्राच्या दिशेने भक्कम वाटचाल

महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात व्यापक परिवर्तन घडवून आणत 'निरोगी महाराष्ट्र, सक्षम महाराष्ट्र' या ध्येयाकडे भक्कम पावले टाकली आहेत. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, आधुनिक उपचार सुविधा, तंत्रज्ञानाधारित आरोग्य व्यवस्थापन, महिला व बाल आरोग्य संवर्धन, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांवरील नियंत्रण; तसेच लोकसहभागाच्या माध्यमातून राज्याची आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम होत आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य सेवांचा विस्तार, गुणवत्तापूर्ण उपचार सुविधा आणि आरोग्य जनजागृती यावर विशेष भर देण्यात येत आहे.

यामुळे ग्रामीण ते शहरी भागापर्यंत लाखो नागरिकांना वेळेवर आणि परवडणाऱ्या आरोग्य सेवांचा लाभ मिळत आहे.राज्यातील प्रत्येक गाव निरोगी, स्वच्छ आणि आरोग्यदृष्ट्या सक्षम व्हावे या उद्देशाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. ग्रामपंचायत, आशा सेविका, आरोग्य कर्मचारी, युवक मंडळे आणि ग्रामस्थ यांच्या सक्रिय सहभागातून गावागावात आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. स्वच्छता, पाणी, पोषण आणि व्यायाम यावर भर देत आरोग्य हा केवळ उपचारांचा विषय नसून लोकचळवळ बनावी, या दृष्टीने हा उपक्रम राज्यभर प्रभावीपणे विस्तारत आहे. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत राज्यात ८१७ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४३ नागरी सामुदायिक आरोग्य केंद्रे, १९०४ आयुष्मान आरोग्य मंदिरे, ६७५ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने कार्यरत आहेत.

शहरी भागातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा, निदान आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात या यंत्रणांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. ई-संजीवनी आणि टेलिमेडिसिनच्या माध्यमातून तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला थेट घरी पोहोचत आहे.महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी राबविण्यात आलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानाला राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या अभियानांतर्गत २.३५ लाखांहून अधिक आरोग्य शिबिरे आणि १.१३ कोटींहून अधिक महिलांची तपासणी करण्यात आली. उच्च रक्तदाब, मधुमेह, स्तन कर्करोग, गर्भाशय मुखाचा कर्करोग, रक्तक्षय यांसारख्या आजारांचे लवकर निदान करून महिलांना उपचार व समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. महिलांच्या




रजोनिवृत्तीनंतर उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी राज्यातील जिल्हा आणि उपजिल्हा रुग्णालयांमध्ये मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्यात आली आहेत.

यामुळे महिलांना विशेष समुपदेशन, आहार मार्गदर्शन आणि आवश्यक तपासण्या एकाच ठिकाणी मिळत आहेत.माता व बाल आरोग्य क्षेत्रात महाराष्ट्राने देशासाठी आदर्श निर्माण केला आहे. एसआरएस-२०२३ अहवालानुसार नवजात मृत्युदर ११, अर्भक मृत्युदर १४, पाच वर्षांखालील बालमृत्युदर १६ इतका कमी झाला आहे. भारताने २०३० पर्यंत साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले मानांकन महाराष्ट्राने आधीच गाठले आहे. राज्यातील विशेष नवजात शिशुकाळजी कक्ष, पोषण पुनर्वसन केंद्रे आणि स्तनपान व्यवस्थापन केंद्रांमुळे बाल आरोग्य सेवांना मोठे बळ मिळाले आहे. अंगणवाडी आणि शाळांमधून पोषण आहार, वाढीवर लक्ष आणि नियमित तपासण्या यामुळे बालकांच्या आरोग्यात लक्षणीय सुधारणा झाली आहे.राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत २.१३ कोटींहून अधिक बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. हजारो बालकांवर हृदय शस्त्रक्रिया व इतर जीवनरक्षक उपचार करून त्यांना नवजीवन देण्यात आले.

राज्यात नियमित लसीकरणाचे ९२ टक्के उद्दिष्ट साध्य झाले आहे. बालकांना विविध संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण देण्यासाठी व्यापक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षणासाठी एचपीव्ही लसीकरण मोहिमेलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा ग्रामीण व निमशहरी भागात उपलब्ध व्हाव्यात यासाठी २३ नवीन कार्डियाक कॅथलॅब, लिथोट्रिप्सी सुविधा, अत्याधुनिक निदान सेवा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे. तसेच शासकीय रुग्णालयांमध्ये अनेक तपासण्या आणि उपचार मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचार लांबणीवर जाण्याचे प्रमाण कमी झाले आहे.राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राज्यात व्यापक प्रमाणात निदान, उपचार आणि पोषण सहाय्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. २०२५ मध्ये शोधण्यात आलेल्या क्षयरुग्णांपैकी ८८ टक्के रुग्ण उपचारानंतर बरे झाले आहेत. 'टीबी मुक्त भारत' अभियानाला महाराष्ट्रातून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत आहे.

आशा सेविका आणि आरोग्य मित्रांच्या माध्यमातून रुग्णांचा नियमित पाठपुरावा केला जात आहे.मलेरिया, डेंग्यू, चिकुनगुनिया, कुष्ठरोग, हत्तीरोग आणि रेबीज यांसारख्या आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्यभर विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य कर्मचारी आणि नागरिक यांच्या सहभागामुळे या मोहिमांना प्रभावी यश मिळत आहे. कर्करोग आणि इतर गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये पॅलिएटिव्ह केअर सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. घरभेटी, समुपदेशन, वेदना नियंत्रण आणि दूरवैद्यकीय सेवा यांमुळे हजारो कुटुंबांना आधार मिळत आहे.राज्यात २०२५ मध्ये २३.६९ लाख युनिट रक्त संकलित झाले असून त्यापैकी ९९.५८ टक्के रक्तदान स्वैच्छिक स्वरूपाचे आहे. रक्तदान चळवळीत महाराष्ट्राने पुन्हा एकदा देशात अग्रस्थान कायम राखले आहे. सिकलसेल ॲनिमिया निर्मूलनासाठी राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये 'अरुणोदय' अभियान राबविण्यात येत आहे.

तपासणी, समुपदेशन आणि जनजागृतीच्या माध्यमातून या आनुवंशिक आजाराविरुद्ध व्यापक लढा उभारण्यात आला आहे.आरोग्य व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, डिजिटल रुग्ण नोंदी, औषध पुरवठा साखळीचे सक्षमीकरण आणि जिल्हा रुग्णालयांचे आधुनिकीकरण यावरही भर देण्यात आला आहे. योग, व्यायाम, मानसिक आरोग्य आणि जीवनशैली व्यवस्थापन याविषयी जनजागृती मोहिमांद्वारे नागरिकांना प्रतिबंधात्मक आरोग्याची सवय लावण्यात येत आहे.


आधुनिक आरोग्य सुविधा, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, प्रशिक्षित मनुष्यबळ, महिला व बाल आरोग्यावरील विशेष भर, संसर्गजन्य रोग नियंत्रण आणि लोकसहभाग यांचा समन्वय साधत महाराष्ट्र आरोग्य क्षेत्रात नवे मानदंड निर्माण करीत आहे. ग्रामीण ते शहरी भागापर्यंत प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देत राज्य शासन 'निरोगी महाराष्ट्र, सक्षम महाराष्ट्र' या ध्येयाच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करीत आहे. लोकसहभाग, आधुनिक आरोग्य सेवा आणि सुजाण नागरिक यांच्या बळावर निरोगी महाराष्ट्राचे स्वप्न आता वास्तवात उतरू लागले आहे.

**-दत्तात्रय कोकरे,** विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय मुंबई




## व्हॉट्सॲप युजर्स सावधान, कोणत्याही मीमवर क्लिक नको!

आजकाल सोशल मीडियाचे युग आहे. लोक आता पोस्टपेक्षा मीम्सद्वारे जास्त संवाद साधतात. मीम्स हे फक्त मजा आणि हास्यासाठी नसून आता आपल्या दैनंदिन संभाषणाचा भाग बनले आहेत. विशेषतः जेन-झी साठी, ते एक प्रकारची भाषा बनले आहेत. ट्रेंडिंग मीम पाहताच, आपण ते लगेच आपल्या मित्रांना पाठवतो आणि तासनतास त्याबद्दल बोलत राहतो. तथापि, हे मीम्स तुमच्या गोपनीयतेसाठी मोठा धोका बनू शकतात.




खरंतर, असा व्हायरस (मालवेअर किंवा स्पायवेअर) या मीम्सशी संबंधित आहे, जो फोनमध्ये प्रवेश करून बँक खाते, पासवर्ड आणि वैयक्तिक डेटा चोरू शकतो. त्यामुळे अशा मीम्सची ओळख पटवणे आणि वेळीच सतर्क होणे खूप महत्वाचे आहे. व्हायरस मीम्स म्हणजे असे फोटो जे दिसायला मजेदार व सामान्य दिसतात, पण त्यांच्या आत एक धोकादायक व्हायरस लपलेला असतो. जेव्हा तुम्ही ते डाउनलोड करता किंवा उघडता तेव्हा ते तुमच्या मोबाईल किंवा संगणकाला हानी पोहोचवू शकतात. तुमची माहितीदेखील चोरू शकतात.

हे मीम्स अगदी सामान्य मीम्ससारखे दिसतात. जसे की मजेदार कॅप्शन असलेले फोटो, लोकप्रिय ट्रेंड आणि सेलिब्रिटी किंवा राजकारणाशी संबंधित विनोदांवर बनवलेले मीम्स.बाहेरून कळत नाही की त्यांच्या आत काही कोड आहे, जो डाउनलोड केल्यानंतर सक्रिय होतो. कधीकधी ते लिंक किंवा फाईलच्या स्वरूपात येतात, जे उघडल्यावर फोन किंवा संगणकात व्हायरस निर्माण करतात.जेव्हा तुम्ही व्हायरस असलेले मीम डाउनलोड करता तेव्हा ते तुमच्या मोबाईल किंवा संगणकासाठी एक मोठा धोका बनू शकते. हे फक्त मजेदार फोटो नाहीत तर त्यामध्ये लपलेले व्हायरस आणि धोकादायक कोड तुमच्या डिव्हाइसला हानी पोहोचवू शकतात. यामुळे वैयक्तिक माहिती चोरीला जाऊ शकते आणि तुमचे डिव्हाइस योग्यरित्या काम करणार नाही. त्यामुळे, नकळत असे मीम डाउनलोड करणे खूप धोकादायक आहे. अनेकदा आपण सोशल मीडिया किंवा चॅट्सवर असे मीम्स पाहतो, जे आपल्याला हसवतात किंवा विचार करायला लावतात. बहुतेक मीम्स फक्त मनोरंजनासाठी बनवले जातात, परंतु काही सायबर गुन्हेगार त्यांचा वापर तुमच्या मोबाईल किंवा संगणकाला हानी पोहोचवण्यासाठी करतात. हे मीम्स सामान्य दिसू शकतात, परंतु त्यांच्या आत एक व्हायरस किंवा धोकादायक कोड लपलेला असतो.

# प्रसिद्ध साहित्यिक ना.सी. फडके

### निमित्त

नारायण सीताराम फडके हे युगप्रवर्तक मराठी कादंबरीकार, कथाकार, मराठी लघुनिबंधाचे आद्य प्रवर्तक आणि साहित्य समीक्षक. त्यांचा जन्म ४ ऑगस्ट १८९४ रोजी नगर जिल्ह्यातील कर्जत या ठिकाणी झाला. त्यांचे वडील सीताराम फडके हे वेदान्ती होते. वेदान्तनिदर्शन (१९१३) हा व्यासंगपूर्ण ग्रंथ त्यांनी लिहिला आहे. फडक्यांचे प्राथमिक शिक्षण वडूज (जि. नासिक), बार्शी (जि. सोलापूर), पुणे अशा वेगवेगळ्या ठिकाणी, तर माध्यमिक शिक्षण पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात आणि महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन कॉलेजात झाले. १९१७ साली ते एमए झाले. तत्पूर्वीच, १९१६ मध्ये न्यू पूना कॉलेजात (आजचे स. प. महाविद्यालय) प्राध्यापक झाले.




'मेणाचा ठसा' ही फडके यांची पहिली कथा केरळ कोकिळ या मासिकात प्रसिद्ध झाली (१९१२). 'अल्ला हो अकबर!' (१९१७) ही त्यांची पहिली कादंबरी. मारी कोरेली या इंग्रज कादंबरीकर्तीच्या टेंपरल पॉवर या कादंबरीच्या आधारे ती लिहिलेली आहे. त्यानंतर त्यांनी अनेक कथा व कादंबऱ्या लिहिल्या. कला ही कलेसाठीच असते वाचकांना सौंदर्यदर्शन घडविणे व आल्हाद देणे हेच कादंबरीकाराचे प्रमुख कार्य या भूमिकेतून त्यांनी प्रमाणबद्ध, आटोपशीर आणि लाघवयुक्त कादंबऱ्यांचे एक युगच मराठीत सुरू केले. 'कुलाब्याची दांडी' (१९२५), 'जादूगार' (१९२८), 'दौलत' (१९२९), 'अटकेपार' (१९३१), 'निरंजन' (१९३२) ह्या त्यांच्या आरंभीच्या कादंबऱ्यांतील प्रणयरम्यता, कुशल, सफाईदार व्यक्तिरेखन, चतुर संवाद आणि मोहक भाषाशैली या गुणांनी वाचकांच्या मनांची पकड घेतली. यानंतरच्या 'उद्धार' (१९३५), 'प्रवासी' (१९३७), 'अखेरचं बंड' (आवृ. दुसरी, १९४४) या कादंबऱ्यांतून प्रणयरम्यतेला त्यांनी गंभीर विषयांची जोड दिली आणि महाराष्ट्रातील काही असामान्य व्यक्तिमत्त्वांचे दर्शन त्यांतून घडविले. तथापि हे करीत असताना कल्पितालाही त्यांनी वाव दिला आणि या कादंबऱ्या 'चरित्रात्मक' होऊ दिल्या नाहीत. गेल्या पन्नास-साठ वर्षांतील महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक घडामोडींचा उपयोग त्यांनी आपल्या पुढील कादंबऱ्यांतून पार्श्वभूमीसाठी करून घेतला. 'बेचाळीसचे पत्रीसरकार' (झंझावात, १९४८), 'काश्मीरचे स्वातंत्र्योत्तर राजकारण' (जेहम, १९४८), 'गोवामुक्तीचे आंदोलन' (उजाडलं ! पण सूर्य कुठे आहे? १९५०) अशा काही कादंबऱ्या त्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत.

'ऋतुसंहार' (१९५८), 'कुहू! कुहू!' (१९६०), 'ही का कल्पद्रुमांची फळं?' (१९६१), 'एक होता युवराज' (१९६४) या त्यांच्या नंतरच्या कादंबर्यांपैकी काही होत. सखोल, अनाकलनीय, गूढ व झपाटून टाकणारे जीवनानुभव फडके ह्यांच्या कादंबऱ्यांतून प्रत्ययास येत नाहीत, तथापि कादंबरी लेखनाबाबत त्यांनी स्वीकारलेल्या भूमिकेशी आणि लेखनतंत्राशी त्या नेहमीच सुसंगत राहिल्या. त्यांच्या काही कादंबऱ्या व कथांचे इंग्रजीसह इतर भारतीय भाषांतून अनुवाद झालेले आहेत. कलंक शोभा (१९३३) या त्यांच्या कादंबरीवरून मराठी चित्रपटही काढण्यात आला होता. अशा या महान साहित्यिकाचे २२ ऑक्टोबर १९७८ रोजी निधन झाले.

**(साभार इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### रक्ताच्या कमतरतेवर आहारात करा बदल

जेव्हा शरीरात हिमोग्लोबिनचे उत्पादन कमी होते, तेव्हा लाल रक्तपेशी तयार होत नाहीत. त्यामुळे निमिया होऊ शकतो. म्हणजे सामान्य भाषेत रक्ताची कमतरता. यामुळे त्वचा पिवळी पडते, चेहरा व पाय या सारख्या अवयवांना सूज येते, चक्कर येते. अशक्तपणा जाणवतो, श्वास घेण्यात अडचण येणे, हृदयाचे ठोके अनियमित होतात. अशी वेगवेगळी लक्षणे दिसू लागतात. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि स्वतःची तपासणी करून घ्यावी. सोबत काही पदार्थांचा आहारात समावेश करु शकता.



शरीरातील अशक्तपणाचे मुख्य कारण म्हणजे शरीरात लोहाची कमतरता. यामागे अनेक कारणे असू शकतात, जसे की मासिक पाळीत जास्त रक्तस्राव होणे, खाण्याच्या योग्य सवयींचा अभाव, त्यामुळे कोणते पदार्थ खाल्ल्याने शरीरातील हिमोग्लोबिनचे उत्पादन वाढण्यास मदत होते हे जाणून घेऊया...

**ही फळे खाणे फायदेशीर**

ज्यांना निमियाचा त्रास आहे त्यांनी रोजच्या दिनचर्येत सफरचंद आणि डाळिंबाचे सेवन करावे. ही दोन्ही फळे निमियाच्या समस्येवर खूप फायदेशीर मानली जातात आणि इतर पोषक तत्वांची कमतरता देखील पूर्ण करतात.

**मनुका खा**

दररोज मनुका खाणे देखील रक्ताची कमतरता दूर करण्यासाठी फायदेशीर मानले जाते. मनुका लोहाचा चांगला स्रोत आहे. मनुके रात्रभर भिजत ठेवा आणि रोज सकाळी सेवन करा. याशिवाय द्राक्षे खाणेही फायदेशीर आहे.

**हिरव्या पालेभाज्या**

पालक आणि इतर हिरव्या पालेभाज्या देखील लोहाचा उत्कृष्ट स्त्रोत आहेत. त्यामुळे हिमोग्लोबिनची पातळी वाढवण्यास मदत होते. त्यामुळे रोजच्या दिनचर्येत हिरव्या पालेभाज्यांचे सेवन करावे.

**दुग्धजन्य पदार्थांचे सेवन**

दूध आणि त्याची उत्पादने जसे की चीज, दही इ. सर्व दुग्धजन्य पदार्थ हे पौष्टिकतेचे उत्तम स्रोत आहेत जे तुमच्या शरीराला केवळ ताकद देत नाहीत तर हिमोग्लोबिनच्या उत्पादनास प्रोत्साहन देतात. अशक्तपणाची समस्या असल्यास दुग्धजन्य पदार्थ रोज घ्यावेत.

# माणगावला स्वतंत्र वीज उपकेंद्राची मागणी

## पाच एकर जागेअभावी रखडला महत्त्वाकांक्षी प्रकल्प

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहर आणि तालुक्यात वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होणे, विद्युत दाबाचा सतत कमी-जास्त होणारा खेळ आणि त्यामुळे विस्कळीत होणारा पाणीपुरवठा यामुळे नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. घरगुती ग्राहक, व्यापारी, उद्योग, शासकीय कार्यालये, शाळा-महाविद्यालये तसेच रुग्णालयांनाही या समस्येचा मोठा फटका बसत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर माणगाव येथे स्वतंत्र वीज उपकेंद्र उभारणे ही काळाची गरज बनली असून, हा प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.




महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, माणगावसाठी स्वतंत्र वीज उपकेंद्राचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असून कंपनी प्रकल्प उभारण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. मात्र उपकेंद्रासाठी आवश्यक असलेली सुमारे पाच एकर जागा अद्याप उपलब्ध न झाल्याने हा महत्त्वाचा प्रकल्प रखडला आहे. शासन अथवा नगरपंचायतीमार्फत जमीन उपलब्ध होताच उपकेंद्र उभारण्याचे काम तातडीने सुरू करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. माणगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी सांगितले की, वीज वितरण कंपनीला आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली आहे. नगरपंचायत हद्दीतील उपलब्ध जागांचे सर्वेक्षण करून योग्य जागा निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू असून त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

सध्या माणगाव शहराचा वीजपुरवठा कांदळगाव आणि गोरेगाव येथील वीज केंद्रांवर अवलंबून आहे. वाढता वीजभार, तांत्रिक बिघाड किंवा देखभाल दुरुस्तीमुळे संपूर्ण शहराला वारंवार अंधाराचा सामना करावा लागतो. विद्युत दाबातील चढ-उतारामुळे घरगुती आणि व्यावसायिक विद्युत उपकरणांचे नुकसान होत असून नागरिकांचे आर्थिक नुकसानही वाढत आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याने शहरातील पाणीपुरवठाही विस्कळीत होतो. अनेक भागांमध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तासन तास प्रतीक्षा करावी लागते. व्यापाऱ्यांचे व्यवहार ठप्प होतात, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येतो, तर रुग्णालये आणि अत्यावश्यक सेवांवरही त्याचा परिणाम होत आहे.

दरम्यान, या प्रश्नाची खासदार सुनील तटकरे आणि राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी दखल घेतली असून प्रकल्पासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देणे आणि शासनस्तरावरील मंजुरीची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. माणगावच्या विकासासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याने तो तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग** : रायगड जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि.२) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २८२ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून २,३१,५००/- रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# रायगडच्या मातीत फुलला थायलंडचा 'जस्मिन राईस'!

## कृषीभूषण मिनेश गाडगीळ यांचा यशस्वी प्रयोग

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पावसाचा लहरीपणा, अतिवृष्टी आणि नैसर्गिक अडचणींवर यशस्वी मात करत पनवेल तालुक्यातील गुळसुंदे येथील प्रयोगशील 'कृषी भूषण' शेतकरी मिनेश गाडगीळ यांनी जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या थायलंडच्या 'जस्मिन राईस'ची यंदा यशस्वी लागवड केली आहे.पूर्णपणे स्व-संशोधित सेंद्रिय द्रव्यांच्या जोरावर घेतलेला हा प्रयोग रायगडच्या कृषी क्षेत्रात विशेष चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरत आहे.

गेल्या वर्षी गाडगीळ यांनी थायलंडवरून जस्मिन राईसचे बियाणे मागवले होते. पहिल्या वर्षी विविध नैसर्गिक अडचणींचा सामना करत सुमारे दोन किलो भाताचे उत्पन्न मिळाले. यंदा याच धान्यापासून पुनरुत्पादन करण्याचे नियोजन त्यांनी केले.

मात्र, यंदा मुळातच मान्सून लांबल्याने पेरणी वेळेत करता आली नाही. त्यानंतर सुरू झालेल्या धुवाधार पावसाने रायगड जिल्ह्यात हाहाकार माजवला. नद्या, नाले आणि शेते तुडुंब भरल्याने अनेकांची पेरलेली धान्ये उगवली नाहीत, तर कमी प्रमाणात उगवलेली रोपे कुजून गेली.या काळात योग्य संधी साधत मिनेश गाडगीळ यांनी २२ जून रोजी पेरणी केली आणि सुरुवातीला बोरवेलच्या साहाय्याने पाणी दिले. अवघ्या चार ते पाच दिवसांत धान्य व्यवस्थित उगवून आले आणि त्यानंतर सुरू झालेल्या पावसाचा रोपांना मोठा फायदा झाला. सध्या भाताची नर्सरी अत्यंत उत्तम स्थितीत आहे.याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे.

जस्मिन राईस हा जगातील सर्वाधिक सुगंधी तांदळांपैकी एक मानला जातो. हा तांदूळ पूर्णपणे झिरो ग्लुटेन (Zero Gluten) असून त्यात फॅट्सचे प्रमाण अत्यंत अल्प असते. याशिवाय यामध्ये मोठ्या प्रमाणावर कार्बोहायड्रेट्स, आयर्न (लोह), मॅग्नेशियम, कॅल्शियम, व्हिटॅमिन बी-९ (फॉलिक ॲसिड) आणि ॲंटिऑक्सिडंट गुणधर्म मुबलक प्रमाणात आढळतात.

योग्य नियोजन, चिकाटी आणि सेंद्रिय शेतीची जोड दिली तर प्रतिकूल हवामानातही परदेशी व उच्च दर्जाची पिके यशस्वीरीत्या घेता येतात, हे मिनेश गाडगीळ यांनी आपल्या या प्रयोगातून पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

# मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरातून ४४ जणांना मिळाली नवी दृष्टी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात ७७ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ४४ रुग्णांच्या डोळ्यात मोतीबिंदू आढळल्याने त्यांच्यावर आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यामुळे ४४ रुग्णांच्या आयुष्यात पुन्हा एकदा प्रकाशाचा किरण आला आहे.

ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित या शिबिरात मोफत नेत्र तपासणीसोबतच अल्पदरात चष्म्यांचे वाटपही करण्यात आले. शंकरा आय हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉ. रिद्धी शाह, डॉ. श्रेया गांधी, किर्ती परब आणि समृद्धी जंगम यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन केले.

रोहा सिटिझन फोरमचे हे सलग ५२ वे नेत्र शिबिर ठरले. गेल्या चार वर्षांत या उपक्रमातून ३,५००हून अधिक नेत्ररुग्णांना नव्याने दृष्टी मिळाली आहे.

# रोह्यात श्री धावीर नामसप्ताह

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरातील ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरा लाभलेल्या श्री धावीर नामसप्ताहाला यंदा १२६ वर्षे पूर्ण होत असून, हा उत्सव आजपासून ३ ते १० ऑगस्ट या कालावधीत भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे.

सन १९०१ मध्ये सुरू झालेल्या या नामसप्ताहाने अनेक पिढ्यांची धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा जपली आहे. सुरुवातीच्या काळात गावातील विविध समाजघटकांच्या सहभागातून हा सप्ताह साजरा होत असे. नंतर ब्राह्मण समाजाच्या पुढाकारातून श्री धावीर मंदिरात नामसप्ताहाची परंपरा सुरू राहिली. बदलत्या काळात अनेक अडचणी आल्या, तरीही ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे ही परंपरा अखंड सुरू आहे.

पूर्वी गावातील ज्येष्ठ मंडळी २४ तास भजन, काकड आरती, पालखी, कीर्तन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन करत असत. आजही त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन नव्या पिढीच्या सहभागातून सप्ताह उत्साहात साजरा केला जात आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मैनाबाई शिवराम कुंभारकर, आत्माराम हरिभाऊ म्हात्रे, परशुराम हरिभाऊ म्हात्रे, सुरेखा विलास म्हात्रे यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमिन आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले असून या व्यवहाराची जाहिर नोटीस विद्यमान मालक यांच्या संमतीने देण्यात येत आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे-पाले बुद्रूक, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड**

| शेतकऱ्याचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| मैनाबाई शिवराम कुंभारकर, आत्माराम हरिभाऊ म्हात्रे, परशुराम हरिभाऊ म्हात्रे, सुरेखा विलास म्हात्रे | ४९/१/क | ०-३४-९०<br>पोख. ०-०३-८०<br>एकुण ०-३८-७०<br>पैकी ०-२०-०० | ७.२५ |

वर वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबेकब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांने दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकती बाबत अन्य कोणचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबध, बोजा, गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटनेस मेहर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क हितसंबध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तिंना सदर हरकतीबाबत त्या हरकती संबधिच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत आणुन द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकती निर्वेध आहे असे समजुन माझे अशिल सदर व्यवहार पुर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

दिनांक : ०३/०८/२०२६

सही/-
**ॲड.एच.जे. शेळके**

पत्ता- स्वरांजली हौसिंग सोसायटी, तळ मजला, सदनिका क्र.१०२, रूपाली सिनेमाजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. मोबा.नं. ९८२०३८६७५१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, मौजे जासई, ता. उरण, जि. रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकतीचे मालक रमण बाळकृष्ण घरत, रतन बाळकृष्ण घरत, शारदा दत्ताराम पाटील, मंदा किसन ठाकूर यांची मालकीची व ताबेकबजामध्ये असलेली मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे जासई, ता. उरण, जि. रायगड येथील शेतीजमीन मिळकत**

| जमीन मालकाचे नाव | स. नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १. रमण बाळकृष्ण घरत<br>२. रतन बाळकृष्ण घरत<br>३. शारदा दत्ताराम पाटील<br>४. मंदा किसन ठाकूर | २०७/४ | ०.०८.००<br>पो. ख. ०.०८.००<br>एकूण ०.१६.०० | १.१२ |

सबब सदरहू वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीस प्रसिद्ध करण्यात आले तारखेपासून (१४) चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकत खालील पत्यावर दाखल करावी. विहित मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

**दिनांक : १५.०७.२०२६**
ठिकाणः- मोहोपाडा

**सही/-**
**योगेश अरुण मानकवळे**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**पत्ता-नविन पोसरी, पो. मोहोपाडा, तालुका खालापूर जिल्हा रायगड ४१०२२२**
**मोबाईल नंबर-९८३३१३०९४५**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे- पालीखुर्द, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १/३/२ | ०-४७-७०<br>वरकस ०-१८-३०<br>पो.ख. ०-११-१०<br>एकूण ०-७७-१०<br>पैकी ०-३८-५५ | ९.२६ | श्री. शांताराम धाया शेळके |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०३/०८/२०२६.**

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मो.क्र. : ९९३०३६९८६१

प्रो. जमा. ५०

### जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील
ॲड समिर राम कुंभार,
ॲड सुजाता हेमंत पाटील,
मो. नं. ९००४४०२३३०
९७६९७१५४४३

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर/क.स्तर) यांचे कोर्टात.**

ने.ता. ९/९/२०२६
नि. ७/ड
दिवाणी चौकशी अर्ज ११५२/२०२६

कै. मंगला प्रभाकर गोरे चे वारस }
१) सौ. रश्मी रमेश वाढेल उर्फ वाधेल, } अर्जदार
वय ५३ वर्षे, धंदा- गृहिणी }
राहणार- १०५, शिव हरी सीएचएस }
बेलवली रोड, स्वप्न नगरी, बदलापुर, पश्चिम, }
बदलापूर जि. ठाणे ४२१५०३ }
**२) सौ. नेहा महेंद्र वनमाळी,** }
वय ५१ वर्षे, धंदा- गृहिणी }
राहणार- २७०९, सीटीएस नं. २ए/४सी, }
मेफेयर थे व्यू, वीर सावरकर रोड, नियर }
सिम्फनी बिल्डिंग, विखरोली वेस्ट, घाटकोपर }
विलेज, मुंबई ४०००७९ }

विरूद्ध

कोणीही नाही } सामनेवाला

ज्याअर्थी कै. मंगला प्रभाकर गोरे, या दिनांक १३/०४/२०२३ रोजी मौजे. सेव्हन हिल्स हॉस्पिटल, अंधेरी, मुंबई. येथे मृत्यू पावले आहेत. तसेच त्यांची आई **कै. अन्नपूर्णा दत्तात्रय गाडगीळ**, या मौजे. भट्टवाडी, चुनाकोळवण, ता. लांजा, जि. रत्नागिरी. येथे बऱ्याच वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत. **कै. मंगला प्रभाकर गोरे**, यांचे नावे खालील वर्णनाच्या सामाईक मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - पाली बुद्रुक, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | हिस्सा न. | क्षेत्र. हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| पाली बुद्रुक | ४३ | ३ | ०-१०-१० | ०.२८ |
| पाली बुद्रुक | ४३ | ४ | ०-२०-२० | ०.५३ |

**कै. मंगला प्रभाकर गोरे,** यांस अर्जदार हे कायेदीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

तारीख ३/८/२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक ३/०४/२०२६**

**सही/-**
**सहा. अधिशक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे आंबिवली, तहसील-पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार जयश्री अनंता गडकरी व इतर यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणेः

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे आंबिवली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ९/२/अ | १ | ०-२५-३० | ०-०१-०० | ०-२६-३० | ५.६९ |
| ९/२/ब/१ | १ | ०-२६-३० | ०-०७-१० | ०-३३-४० | २.५६ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **३०** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
**दि. ०३/०८/२०२६.**

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.
( खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.

### जाहीर निविदा सूचना

ग्रामपंचायत आदई, ता. पनवेल जि. रायगड यांचेकडून मान्यताप्राप्त अधिकृत पुरवठाधारकांकडून खाली नमूद केल्याप्रमाणे साहित्य व सेवा पुरवठा करण्याकरिता सीलबंद लिफाफा मध्ये निविदा दरपत्रके मागविण्यात येत आहेत. निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक वार बुधवार दि.११/०८/२०२६ रोजी सांयकाळी ५ वाजेपर्यंत राहील. सदर प्राप्त निविदा दि. १२/०८/२०२६ रोजी उघडण्यात येतील. सदर निविदा कोणत्याही कारणाशिवाय मंजूर / नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | निधीचा स्त्रोत | तरतूद रक्कम | पुरवठा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत आदई हद्दीतील नेवाळी गणेश घाट दुरुस्ती आणि साफसफाई करणे. | ग्रामनिधी २६-२७ | १९९५०९/- | ६ महिने |

अटी व शर्तीः-

१) अर्जदारांना सदर विकास कामाची कोरी निविदा पत्र दि. ०४/०८/२०२६ ते दि. ११/०८/२०२६ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यलयात उपलब्ध होतील.
२) भरलेली सिलबंद निविदा दि.११/०८/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
३) आलेल्या निविदा दि. १२/०८/२०२६ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता उघडण्यात येतील.
४) इसारा रक्कम रोखीने अथवा डिमांड ड्राफ्टने स्वीकरण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट ग्रामपंचायत आदई यांचे नावे असावा.
५) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
६) निविदा फॉर्म किंमत ना परतावा राहील.
७) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.
८) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
९) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार राहावे लागेल.
१०) झालेल्या तांत्रिक मुल्यांकन प्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
११) मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व ग्रामपंचायतीच्या खाली करायचे आहे
१२) निविदा मंजूर केल्यावर रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जमीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१३) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१४) काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.
१५) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.
१६) शासकीय नियमाप्रमाणे देयकातून शासकीय कपात करण्यात येईल.
१७) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार प्रशासक यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**श्रीमती. स्वप्नाली प्रशांत बागल**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत आदई**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**संतोष नामदेव ठोंबरे**
**प्रशासक**
**ग्रामपंचायत आदई**
**ता.पनवेल, जि.रायगड**

# सिऍटलमध्ये रंगणार 'बीएमएम २०२६'

## देश-विदेशातील २५००हून अधिक मराठी बांधवांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

उत्तर अमेरिकेतील मराठी भाषिकांचा सर्वात मोठा आणि मानाचा सांस्कृतिक व सामाजिक सोहळा असलेले बृहन्महाराष्ट्र मंडळ बीएम अधिवेशन २०२६ यंदा ६ ते ९ ऑगस्टदरम्यान अमेरिकेतील निसर्गरम्य सिऍटल शहरात दिमाखात पार पडणार आहे. "जपूया संस्कृती, विणूया नाती" या ब्रीदवाक्याखाली होणाऱ्या या २२व्या द्वैवार्षिक अधिवेशनात सुमारे २५००हून अधिक मराठी बांधव, उद्योजक, कलाकार, साहित्यिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ एकत्र येणार आहेत.

या सोहळ्याला प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. माधुरी कानिटकर तर प्रमुख पाहुणे म्हणून अविनाश धर्माधिकारी उपस्थित राहणार आहेत. विद्यमान बीएम अध्यक्ष प्रसाद पानवळकर आणि संयोजक मोहित चिटणीस यांच्या नेतृत्वाखालील टीम गेल्या दोन वर्षांपासून सिऍटल डाउनटाउनमधील अत्याधुनिक कन्व्हेन्शन सेंटरमध्ये या सोहळ्याचे भव्य नियोजन करत आहे. या चार दिवसीय महोत्सवात महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती, लोककला, संगीत आणि खाद्यपरंपरेचा




अप्रतिम आविष्कार पाहायला मिळणार आहे. उत्तर अमेरिकेतील स्थानिक कलाकारांचे "अवघा रंग एकचि झाला" हे नाटक आणि "नवोदित पिढीचा तीर्थ विठ्ठल" हा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम मुख्य आकर्षण ठरणार आहे.

भारताहून येणाऱ्या नामवंत कलाकारांमध्ये "ऑल दि बेस्ट" हे नाटक, "द फोक आख्यान", आरती अंकलीकर यांची संगीत रस-सुरस मैफल, प्रशांत दामले व संकर्षण कऱ्हाडे यांचा "नाटकामागचे नाटक" हा कार्यक्रम रसिकांसाठी खास पर्वणी ठरणार आहे. याशिवाय डॉ. सलील कुलकर्णी, संजय उपाध्ये, सुनंदन लेले आणि निलेश ओक यांची उपस्थितीदेखील लाभणार आहे. केवळ सांस्कृतिक कार्यक्रमच नव्हे तर जागतिक स्तरावर मराठी उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी बी-कनेक्ट आणि रिअल इस्टेट एक्स्पोचेही विशेष आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय कलास्पंदन व कलादालनच्या माध्यमातून जागतिक कीर्तीचे चित्रकार प्रमोद कुर्लेकर आणि सुचित्रा भोसले यांच्या कलाविश्वाचा अनुभव घेण्याची संधी उपस्थित रसिकांना मिळणार असल्याची माहिती रश्मी खामकर-साठे यांनी दिली.

# स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करा : मच्छिंद्र बोऱ्हाडे

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण सोहळा अमेरिकन फेलोशिप विनर व शिक्षण अभ्यासक मच्छिंद्र बोऱ्हाडे आणि संस्थेचे कुलसचिव दिनेश मिसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

पुणे विद्यार्थीगृह संस्थेच्या माजी विद्यार्थी संकेत वैद्य यांच्या संकल्पनेतून दरवर्षी लोकशाही पद्धतीने विद्यार्थी मंत्रिमंडळ निवडले जाते. पारदर्शक निवडणुका होऊन निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या परिषदेची स्थापना ख्यातनाम व्यक्तींच्या उपस्थितीत होते. या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून मच्छिंद्र बोऱ्हाडे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पदाची शपथ, बॅज आणि विद्यार्थी परिषदेचे सदस्यत्व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांप्रमाणे आदर्श प्रस्थापित करावा. आपल्या देशावर प्रेम जरूर असावे, पण त्याबरोबर जागतिक नागरिक होण्याचे निकष लक्षात घ्यावेत. एआयशी मैत्री करून नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. मोबाइलचा वापर आपल्या प्रगतीसाठी खूप चांगला होऊ शकतो. व्यक्तिमत्त्व केवळ दिसण्यावर नसून आपली भाषा, आपले विचार आणि वर्तन हेच आपल्यात विकास घडवून आणतात. संवाद कौशल्ये विकसित करण्यावर भर द्यावा. यशासाठी कोणताही शॉर्टकट नसतो. विद्यार्थ्यांनी कामात चिकाटी व सातत्य ठेवावे. टीका करणाऱ्यांकडे दुर्लक्ष करावे आणि योग्य मार्गाने व्यक्त व्हावे. प्रत्येक संधीचा उपयोग करून घ्यावा. भरपूर वाचन करा आणि नवनवीन कौशल्ये आत्मसात करावीत. सामान्यज्ञान वृद्धिंगत करावे, असा सल्ला बोऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कुलसचिव दिनेश मिसाळ, समन्वयक पांडुरंग मुळीक, आदर्श शिक्षक अविनाश कुलकर्णी यांनी सर्व नवनिर्वाचित सदस्यांना शुभेच्छा दिल्या.



# घणसोली कॉलनीतील पाणीटंचाई दूर करण्याची मागणी



**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोली कॉलनी सेक्टर १ ते ९ परिसरात गेल्या काही दिवसांपासून नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. या गंभीर समस्येची दखल घेत नवी मुंबई महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता शंकर जाधव यांची भेट घेऊन त्यांना भाजपचे सामाजिक कार्यकर्ते योगेश पाटील यांनी निवेदन सादर केले.

या निवेदनाद्वारे सेक्टर १ ते ९ मधील नागरिकांना नियमित, पुरेशा दाबाने व सुरळीत पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली. तसेच सध्या लागू असलेली पाणीकपात लवकरात लवकर कमी करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशीही ठाम मागणी करण्यात आली. नागरिकांना पिण्याचे पाणी ही मूलभूत गरज असून पाणीटंचाईची समस्या तातडीने सोडविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करून नियमित पाणीपुरवठा पूर्ववत करावा, असे म्हटले आहे.

# सानपाड्यात ४५ कोटींची अत्याधुनिक सेंट्रल लायब्ररी

## आमदार म्हात्रेंनी घेतला आढावा

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या संकल्पनेतून आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सानपाडा येथे महाराष्ट्रातील सर्वात मोठी, अत्याधुनिक आणि सर्वसमावेशक 'सेंट्रल लायब्ररी' साकार होत आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या बांधकामाची आमदार म्हात्रे यांनी सोमवारी (दि. ३) प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी त्यांनी महापालिका अधिकारी, वास्तुविशारद आणि संबंधित यंत्रणांशी चर्चा करून दर्जेदार व वेळेत काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. सानपाडा सेक्टर-११ येथील भूखंड क्रमांक १, क्षेत्रफळ १७७०.७३ चौ.मी. येथे उभारण्यात येणारी ही भव्य वास्तू बेसमेंट + तळमजला + चार मजले अशी आहे. या प्रकल्पासाठी नवी मुंबई महानगरपालिकेकडून २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून एकूण प्रकल्पाची किंमत ४५ कोटी रुपयांहून अधिक आहे. वास्तूचे कामकाज पूर्णत्वाच्या मार्गावर असून लवकरच लोकार्पण करण्यात



येणार आहे.

डिजिटल युगातील बदलत्या गरजा लक्षात घेऊन या मध्यवर्ती ग्रंथालयाची रचना करण्यात आली आहे. पारंपरिक ग्रंथसंपदेसोबतच अत्याधुनिक ई-लायब्ररी, ऑडिओ बुक्स, लँग्वेज लॅब, पुस्तकांचा इतिहास उलगडणारे विशेष प्रदर्शन, दृष्टीहीन वाचकांसाठी स्वतंत्र ब्रेल विभाग तसेच मराठी, हिंदी, इंग्रजीसह विविध भाषांतील समृद्ध साहित्यसंपदा येथे उपलब्ध असणार आहे. विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवकांसाठी स्वतंत्र MPSC, UPSC अभ्यास कक्ष, आधुनिक आर्ट गॅलरी, ग्रंथविषयक उपक्रम, चर्चासत्रे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी १३० आसनक्षमतेचे अत्याधुनिक सभागृह, आकर्षक व्ह्यूइंग गॅलरी, सुसज्ज कॅफेटेरिया तसेच पर्यावरणपूरक ग्रीन बिल्डिंग संकल्पनेवर आधारित सुविधा ही वास्तूची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

त्यामुळे ही वास्तू केवळ ग्रंथालय न राहता ज्ञान, संशोधन, कला, संस्कृती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे एक सक्षम केंद्र म्हणून विकसित होणार आहे. यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, ज्यांच्यामुळे आपल्याला संविधान मिळाले, अधिकार मिळाले, शिक्षण व्यवस्था सुलभ झाली त्या महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव या आधुनिक लायब्ररीला देण्यात येणार आहे. विद्यार्थी, संशोधक, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक आणि सर्वसामान्य वाचकांना जागतिक दर्जाच्या सुविधा एकाच छताखाली उपलब्ध व्हाव्यात हा माझा ध्यास होता. सिडकोकडून भूखंड मिळविण्यापासून ते निधी मंजुरीपर्यंत सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर आज हे स्वप्न प्रत्यक्षात साकार होत आहे. नवी मुंबईच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरणारी ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी अत्याधुनिक लायब्ररी असेल.

या पाहणी दौऱ्यात महापालिकेचे शहर अभियंता शिरीष अरदवाड, कार्यकारी अभियंता प्रशांत देशमुख, उपअभियंते विश्वकांत लोकरे व हरेश बेंदर, सहाय्यक अभियंते अनुजा सासवडकर व मंगलदास कुंवर, वास्तुविशारद मगधा मुरंजन तसेच अश्विनी कन्स्ट्रक्शनचे बसवराज गौडा उपस्थित होते. याशिवाय पांडुरंग आमले, अशोक पाटील, श्रीपाद पत्की, अशोक विधाते, भार्गव मढवी, चिंतामण बेल्हेकर, रूपेश मढवी, मारुती विश्वासराव, आत्माराम कुलवडे, मनोज भोईर, निलेश कचरे, मानव मढवी, नाना शिंदे, सुभाष म्हात्रे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक आणि सानपाडा परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# सानपाड्यात ज्येष्ठांसाठी मोफत एसटी स्मार्टकार्ड आणि बसपास वाटप



**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संदीप नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी (दि. २) सानपाडा येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात एसटी महामंडळाचे एनसीएमसी स्मार्ट कार्ड तसेच नवी मुंबई परिवहन उपक्रमाचे मोफत बसपास काढून देण्यात आले. नगरसेवक सुनील कुरकुटे, प्रभाग क्रमांक १९ यांच्या पुढाकारातून आणि भारत ई-सेवा केंद्राच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाला ज्येष्ठ नागरिकांसह महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आनंदमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

कार्यक्रमाचे उद्घाटन नवी मुंबई परिवहन समितीचे सदस्य राजेश राय, नगरसेवक सुनील कुरकुटे आणि ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले. नगरसेवक सुनील कुरकुटे यांची नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मध्य रेल्वेच्या बोर्डावर सल्लागार सदस्यपदी निवड झाल्याबद्दल ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने त्यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच ज्येष्ठ नागरिकांना नवी मुंबई परिवहन उपक्रमाचा मोफत बसपास मिळवून देण्यासाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल परिवहन समितीचे सदस्य राजेश राय यांचाही सन्मान करण्यात आला.

यावेळी प्रभाग सभापती तथा नगरसेविका शैला पाटील, नगरसेविका शिल्पा ठाकूर, समाजसेवक राजेश ठाकूर आणि विसाजी लोके यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव जगदीश एकावडे, खजिनदार महादेव पाटील, उपाध्यक्ष लक्ष्मण गोळे, सहसचिव राजेंद्र कदम, माजी अध्यक्ष राम काजरोलकर, उपाध्यक्ष विठ्ठल गव्हाणे, सामाजिक कार्यकर्ते रमेश शेट्ये, नम्रता कुरकुटे, राजेश गायकवाड, सुधीर आंग्रे, ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यकर्ते बाळासाहेब थोरात तसेच संघाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वाट चुकलेल्या ट्रेकर्सची पनवेल पोलिसांकडून सुखरूप सुटका

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील सहा तरुण ट्रेकिंगसाठी गेले असता रानसई खैरकुटी, उरण येथील कल्हे गावच्या डोंगरावर अंधारामुळे वाट चुकून अडकले. पनवेल तालुका पोलिसांच्या तत्परतेने सर्वांना सुखरूपपणे खाली आणण्यात आले.

आयुष संदीप गुप्ता (कळंबोली), वेदांत किरण दिवेकर (खांदा कॉलनी), वेदांत नितीन नाईक (रोडपाली), आदित्य जयराम राय (खारघर), प्रसनजीत कुंदन कांबळे (सीवूड्स) आणि निखिल जयस्वार



(रोडपाली) या सहा तरुणांनी २ ऑगस्टला दुपारी ३ वाजता रानसई येथून ट्रेकिंगला सुरुवात केली. दुपारी ते कल्हे गाव, पनवेल येथील डोंगरावर पोहोचले. संध्याकाळी अंधार पडल्याने त्यांना परतीचा मार्ग सापडला नाही. घाबरलेल्या तरुणांनी तातडीने ११२वर संपर्क साधला.

माहिती मिळताच पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गजानन घाडगे आणि गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक आनंद कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट मार्शल हवालदार संजय दोरगे, शिपाई तुकाराम भोये आणि पोलीस पाटील संतोष मोरे यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मोबाइल आणि मॅपच्या मदतीने पोलिसांनी सुमारे दीड तास शोधमोहीम राबवली. अखेर ते सहा तरुणांपर्यंत पोहोचले आणि त्यांना सुखरूपपणे खाली आणण्यात आले.

# राष्ट्रीय नृत्य स्पर्धा व महोत्सवात रॉयल डान्स अकादमीचे यश



**मुंबई : नृत्य दर्पण डान्स अकादमीच्या वतीने ऑल इंडिया २८व्या राष्ट्रीय नृत्य स्पर्धा व महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय स्तरावरील नृत्य स्पर्धेत देशभरातील विविध वयोगटातील कलाकारांना आपले नृत्यकौशल्य सादर करण्याची संधी मिळाली. या स्पर्धा महोत्सवात रॉयल डान्स अकादमीने पारंपरिक नृत्य गटात द्वितीय क्रमांक पटकावला. यात प्रियांका अय्यर, संगीता कांडपाल, ललिता गोविंद, लक्ष्मी साळवे, अनिता रणदिवे, विशाखा गोळपकर, लता कांबळे, आरती सायगावकर, शर्वरी निकम यांचा सहभाग होता. त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

# रायगडचा पालकमंत्री मीच होणार, केवळ डिक्लेरेशन होणे बाकी -मंत्री भरत गोगावले

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचा पालकमंत्री आपल्या सर्वांच्या इच्छेप्रमाणे मीच होणार असून त्यावर केवळ डिक्लेरेशन होणे बाकी असल्याचे प्रतिपादन राज्याचे रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांनी माणगाव येथील पक्ष प्रवेश कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.



माणगाव तालुक्यातील पाणसई गावचे रहिवासी मनसेचे माजी संपर्कप्रमुख जेष्ठ नेते दिलीप सांगले,जिल्हा विद्यार्थी संघटनेचे प्रतीक रहाटे यांच्यासह माणगाव व तळा तालुक्यातील मनसेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेचे नेते राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्वीकारून मंत्री भरत गोगावले यांच्या विकास कामांनी प्रेरित होऊन माणगाव कुणबी भवन येथे रविवार दि.२ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या पक्ष प्रवेश कार्यक्रमात मंत्री भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थित शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला.

यावेळी सर्व प्रवेशकर्त्यांचे मंत्री गोगावले यांनी शिवसेना पक्षात स्वागत करून सर्व प्रवेश कर्त्यांचा पक्षात सन्मान केला जाईल असे सांगितले. या कार्यक्रमास शिवसेनेचे रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे संपर्कप्रमुख अनिल नवगणे, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, जेष्ठ नेते राजाभाऊ रणपिसे, जिल्हा परिषद सदस्य अविनाश नलावडे, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, तालुकाप्रमुख अँड.महेंद्र मानकर, माणगाव पंचायत समिती सभापती विलास शिंदे, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, शहर संपर्कप्रमुख प्रसाद धारिया, शहरप्रमुख नितीन दसवते, डॉ.परेश उभारे, अँड.अच्युत तोंडलेकर, रणधीर कनोजे, सौरभ खैरे, प्रवीण बागवे, फैमिद जामदार आदींसह माणगाव व तळा तालुक्यातील शिवसैनिक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री भरत गोगावले पुढे म्हणाले कि,संघटनेचे काम कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे करा आपण विकास निधी महाड व श्रीवर्धन मतदार संघातील कोणत्याही तालुक्याला कमी पडू देणार नाही. निवडणूक कोणत्याही येऊ द्या त्यासाठी आपण सज्ज आहोत. आपल्या भागात येणाऱ्या कंपन्या या प्रदूषण विरहित असल्या पाहिजेत. चांगल्या कंपन्या आल्या तर त्याला कोणी अडथळा करू नका असे सांगत सर्व प्रवेशकर्त्यांचे शिवसेना पक्षात स्वागत केले.

यावेळी संपर्कप्रमुख अनिल नवगणे, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, तालुकाप्रमुख अँड.महेंद्र माणकर, प्रवेशकर्ते दिलीप सांगले, प्रतीक रहाटे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन युवासेनाप्रमुख विपुल उभारे यांनी केले.

## बोरली ग्रामपंचायतमधील पाच सदस्य अपात्र

### तीन शेकाप, तर राष्ट्रवादी, उबाठा प्रत्येकी एका सदस्याचा समावेश

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील बोरली ग्रामपंचायतमधील पाच सदस्य हे निवडणूक खर्च विहित नमुन्यात व वेळेत दाखल न केल्यामुळे रायगड जिल्हाधिकारी यांनी त्यांना अपात्र ठरवले आहे. निवडणूक खर्च सादर न केल्याने सदस्य अपात्र झाल्याने त्यांचे आपोआप ग्रामपंचायत सदस्य पद गेले असून आता या ठिकाणी पोट निवडणुका लागणार आहेत. मुरुड तालुक्यात पाच ग्रामपंचायत सदस्य केवळ खर्च अहवाल सादर न केल्याची ही पहिलीच घटना आहे.

बोरली ग्रामपंचायत निवडणूक नोव्हेंबर २०२३ रोजी सपन्न झाली होती. त्या वेळी थेट सरपंच शिवसेना शिंदे गटाचा निवडून आला होता. इतर पक्षाचे ग्रामपंचायत सदस्यसुद्धा निवडून आले होते. ग्रामपंचायत निवडणुकीत खर्चाचा अहवाल सादर न केल्याची तक्रार संजय जाय पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. सदरील तक्रारीची शहानिशा मुरुड तहसीलदार यांच्याकडून उपयुक्त अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आला.त्या अनुषंगाने शेकापचे मनोहर भोपी,लता वाघमारे व भारती राम बंदरी , हे तीन सदस्य अपात्र झाले आहेत.तर उपसरपंच सिध्दीका चुनेकर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व उबाठा गटाच्या जगीता कोटकर असे पाच ग्रामपंचायत सदस्य एकाच वेळी अपात्र ठरल्यामुळे त्यांना ग्रामपंचायत सदस्य पद गमवावे लागले आहे. या सदस्यांना पुढील पाच वर्षे निवडणूक लढवता येणार नाही.

बोरली ग्रामपंचायतमध्ये एकूण ११ सदस्य होते. त्यापैकी पाच सदस्य अपात्र ठरल्यामुळे शिवसेनेस आता एकहाती सत्ता प्राप्त झाली आहे. शिवसेना शिंदे गटाचे थेट सरपंच व सदस्य बळ आघाडीवर आहे.

याबाबत रायगड जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी यांनी सांगितले की, बोरली ग्रामपंचायतमध्ये विकासाला विरोध करणाऱ्या लोकांचा विलोप झाला असून आता बोरली ग्रामपंचायतमध्ये साजेसा विकास करता येणार आहे. शिवसेनेचा थेट सरपंच व सदस्य असल्याने ग्रामपंचायतवर शिवसेनेची एकहाती सत्ता असून आगामी काळात विविध विकासकांमध्ये जास्त लक्ष देणार असून विकासकामे गतीने केली जातील.

## पेणमध्ये प्रशासकीय भवनासाठी वैकुंठ पाटील यांचे महसूलमंत्र्यांना साकडे

**पेण : प्रतिनिधी**



पेण प्रांत कार्यालयाच्या प्रशस्त परिसरात तहसील कार्यालयासह सर्व प्रमुख शासकीय कार्यालयांचे एकत्रीकरण करण्याच्या मागणीला पुन्हा जोर आला आहे. आधुनिक एकात्मिक प्रशासकीय भवन उभारण्यात यावे, तसेच गेल्या पाच वर्षांपासून शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या या प्रस्तावाला तातडीने प्रशासकीय व आर्थिक मंजुरी द्यावी, अशी मागणी रायगड जिल्हा परिषदेचे कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे.

निवेदनात वैकुंठ पाटील यांनी नमूद केले आहे की, पेण येथील सध्याचे तहसील कार्यालय ब्रिटिशकालीन जुन्या इमारतीत कार्यरत असून, ही इमारत आजच्या वाढत्या प्रशासकीय गरजांसाठी अपुरी ठरत आहे. दररोज विविध शासकीय कामांसाठी येणारे नागरिक, शेतकरी, वकील, कर्मचारी आणि इतर लाभार्थ्यांना जागेअभावी व सुविधांच्या कमतरतेमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पेण प्रांत कार्यालयाच्या विस्तीर्ण जागेत तहसील कार्यालयासह महसूल विभाग आणि इतर प्रमुख शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी कार्यरत झाल्यास नागरिकांना विविध कार्यालयामध्ये वारंवार हेलपाटे मारावी लागणार नाहीत एकाच परिसरात सर्व सेवा उपलब्ध झाल्याने प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान आणि पारदर्शक होईल असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला आहे .

या संदर्भातील सविस्तर प्रस्ताव मागील पाच वर्षापासून शासन स्तरावर प्रलंबित असल्याचेही पाटील यांनी निवेदन नमूद केले आहे त्यामुळे पेण तालुक्यात नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी आणि भविष्याचे प्रशासकीय गरजा लक्षात घेऊन या प्रस्तावाला तातडीने मंजूर देण्याची मागणी त्यांनी महसूलमंत्र्यांकडे केली आहे.

## पर्यावरण संवर्धनासाठी रिलायन्स कामगार संघटनेचा पुढाकार

**नागोठणे : बातमीदार**

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून अशा लोकोपयोगी उपक्रमांना रिलायन्स व्यवस्थापन नेहमीच सहकार्य करेल, असा विश्वास रिलायन्स नागोठणे कंपनीचे रिलेशन हेड श्रीकांत गोडबोले यांनी व्यक्त केला.



भारतीय श्रमिक शक्ती संघ युनियन रिलायन्स नागोठणे युनिट, भारतीय कामगार सेना रिलायन्स नागोठणे युनिट व सीएसआर विभाग रिलायन्स नागोठणे यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कडसुरे (ता. रोहा) येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या वृक्षारोपण कार्यक्रमाला रिलायन्स कंपनीचे इंडस्ट्रियल रिलेशन हेड श्रीकांत गोडबोले, भारतीय श्रमिक शक्ती संघाचे कार्याध्यक्ष दिपकभाई रानवडे, वरिष्ठ सल्लागार सुभाष खराडे, केंद्रीय सचिव संजय काकडे, नागोठणे युनिट अध्यक्ष किशोर शिर्के, रिलायन्सचे अधिकारी योगेश तलोड, अमोल सोनावणे, सीएसआर विभागाच्या वरदा कुलकर्णी, नागोठणे पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक नरेश थळकर, पोलिस हे. कॉ. मिलिंद महाडिक, पोलिस शिपाई स्वप्नील भालेराव, बळी पुट्टेवाड, भारतीय श्रमिक शक्ती संघाचे कार्याध्यक्ष पंडित तुपकर, उपाध्यक्ष विनोद गोरे, सरचिटणीस चंद्रकांत अडसुळे, चिटणीस यशवंत डाकी, उपाध्यक्ष मनोज पेढवी, उपाध्यक्ष दिनेश शिर्के, राजेश जवके, कायदेशीर सल्लागार ॲड. महेश पवार, मारुती दांडेकर, भारतीय कामगार सेनेचे सरचिटणीस अशोक भोय, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा निलमताई विनोद शिंदे, कडसुरे गावातील रमेश शिर्के, आशा शिर्के, रविंद्र शिर्के, रघुनाथ शिर्के, अनंत शिर्के, दीपक शिर्के, विठोबा शिर्के, भास्कर तुपकर, कडसुरे शाळेचे मुख्याध्यापक भास्कर लेंडी, शिक्षिका निर्मिती कोळी, अंगणवाडी सेविका स्वप्नाली शिर्के, मदतनीस सोनाली शिंदे, वैशाली नमन शिर्के, जयश्री गवंडकर, अस्मिता शिर्के आदींसह ग्रामस्थ व विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी श्रीकांत गोडबोले म्हणाले की, सध्याच्या प्रदूषणयुक्त वातावरणात वृक्षारोपण आणि पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज आहे. कंपनी परिसरातील गावांमध्ये पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या भारतीय श्रमिक शक्ती संघ युनियन व भारतीय कामगार सेना रिलायन्स युनिटच्या पदाधिकारी आणि सदस्यांचे त्यांनी कौतुक केले.

## बल्क ड्रग पार्कविरोधात ११ ग्रामपंचायती एकवटल्या; कोअर कमिटीची स्थापना

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

रोहा आणि माणगाव तालुक्यात डीएमआयसी अंतर्गत प्रस्तावित बल्क ड्रग पार्क (रासायनिक उद्योग प्रकल्प) विरोधातील जनआंदोलनाला आता अधिक संघटित स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या सुमारे ११ ग्रामपंचायतींनी एकत्र येत या प्रकल्पाविरोधात लढा अधिक प्रभावीपणे उभारण्यासाठी स्वतंत्र कोर कमिटी स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. प्रकल्प रद्द होईपर्यंत कोणत्याही परिस्थितीत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धारही ग्रामस्थांनी व्यक्त केला.

शनिवार, २ ऑगस्ट रोजी भाले येथील श्रीराम मंदिरात सभापती विलासजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला. बैठकीला परिसरातील ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन स्थापन करण्यात आलेल्या कोर कमिटीत बाधित ११ ग्रामपंचायतींतील सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक लोकप्रतिनिधी, पर्यावरण व रासायनिक उद्योग विषयाचे जाणकार, तसेच शासनस्तरावर कायदेशीर आणि प्रशासकीय लढा देऊ शकतील अशा अभ्यासू व्यक्तींना सहभागी करून घेण्याचा ठराव करण्यात आला.

भविष्यातील सर्व आंदोलन, जनजागृती, निवेदने आणि कायदेशीर पाठपुरावा या कमिटीमार्फत समन्वयाने करण्यात येणार आहे. बैठकीत बोलताना उपस्थितांनी स्पष्ट केले की, बल्क ड्रग पार्कमधील रासायनिक उद्योगांमुळे पर्यावरण, शेती, जलस्रोत, जैवविविधता आणि स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती आहे. राज्याचे कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले आणि खासदार सुनील तटकरे यांनी स्थानिकांना दिलेल्या आश्वासनानुसार हा प्रकल्प रद्द होईपर्यंत पाठपुरावा करण्याचेही बैठकीत ठरविण्यात आले. सर्व आंदोलन लोकशाही मार्गाने उभारण्याचा संकल्प केला.

## एक गाव, एक गोविंदा संकल्पनेला किशोर जैन यांची भक्कम साथ

**नागोठणे : बातमीदार**

'एक गाव, एक गोविंदा' या प्रेरणादायी संकल्पनेमुळे प्रभावित होऊन आई जोगेश्वरी गोविंदा पथकाला कायमस्वरूपी सहकार्य करण्याचा शब्द दिला असून, यावर्षी पथकाने ठेवलेला ९ थरांचा संकल्प निश्चितच यशस्वी होईल, असा ठाम विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोर जैन यांनी व्यक्त केला.रविवार, दि. २ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजता ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर परिसरात एक गाव एक गोविंदाचे पुरस्कर्ते राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोर जैन यांच्या हस्ते आई जोगेश्वरी गोविंदा पथकाच्या सरावाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात झाला.



यावेळी उपस्थित गोविंदाप्रेमी ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोर जैन बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला किशोर जैन यांच्या समवेत राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, नागोठणेच्या सरपंच सुप्रिया महाडिक, उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, माजी सरपंच विलास चौलकर, माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, शहराध्यक्ष बाळासाहेब टके, माजी उपसरपंच मोहन नागोठणेकर, ग्रामपंचायत सदस्य सचिन ठोंबरे, भाविका गिजे, संजय काकडे, अनिल महाडिक, मनोज टके, बिपीन सोष्टे, शिंदे शिवसेना शहरप्रमुख संतोष चितळकर, प्रसाद जोगत, शेखर जोगत, ॲड. रमेश जाधव, पथकाचे अध्यक्ष भरत गिजे, मार्गदर्शक राजेश सुर्वे, स्वप्नील भोसले, संदीप राऊत, प्रविण आमडोसकर, निलेश पिंपळे यांच्यासह गोविंदा पथकाचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते..कार्यक्रमादरम्यान मागील वर्षी पथकाच्या यशात मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व गोविंदांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सरावाच्या शुभारंभाला विशेषतः तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने संपूर्ण परिसरात गोकुळाष्टमीचा उत्साह अनुभवायला मिळाला.या निमित्ताने श्री जोगेश्वरी माता आणि श्री भैरवनाथ महाराज यांना आई जोगेश्वरी गोविंदा पथकाच्या वतीने चांदीचे मुकुट अर्पण करण्यात आले.

## 'पोस्को स्टील'कडून चांदे शाळेस नवे रूप

**माणगाव : प्रतिनिधी**

पोस्को महाराष्ट्र स्टील प्रा. लि. कंपनीच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) उपक्रमांतर्गत राजिप शाळा चांदे आदिवासीवाडीच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण कामे करण्यात आली. शाळेच्या इमारतीची दुरुस्ती, संपूर्ण रंगरंगोटी, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र व सुसज्ज शौचालयाचे बांधकाम, तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप करून कंपनीने सामाजिक बांधिलकी जपली.

या विकासकामांमुळे शाळेला आकर्षक व सुशोभित स्वरूप प्राप्त झाले असून विद्यार्थ्यांना अधिक सुरक्षित, स्वच्छ व आनंददायी शैक्षणिक वातावरण उपलब्ध झाले आहे.

यावेळी आयोजित कार्यक्रमात निजामपूर बीट विस्तार अधिकारी संजय पालांडे, केंद्रप्रमुख महादेव बांगर, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा कविता वालेकर, सदस्य दत्तात्रय पवार, मुख्याध्यापिका नम्रता बडे, उपशिक्षिक प्रतीक्षा होवाळ, अंगणवाडी सेविका. चंद्रा पवार, स्वयंपाकी शुभांगी शिंदे, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

# बुमराहच्या जागी आकिब नबीला संधी

## पहिल्यांदाच भारतीय कसोटी संघात स्थान



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंका दौऱ्यापूर्वी टीम इंडियातील प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह गुडघ्याच्या दुखापतीमुळे संघाबाहेर पडला आहे. त्याची उणीव भरून काढण्यासाठी बीसीसीआयने अखेर रणजी स्पर्धेत धमाकेदार कामगिरी करून दाखवणाऱ्या जम्मू-काश्मीरच्या गोलंदाजासाठी टीम इंडियाचा दरवाजा उघडला आहे. बुमराहच्या जागी वेगवान गोलंदाज आकिब नबी याला पहिल्यांदाच भारतीय कसोटी संघात स्थान मिळाले आहे.

बीसीसीआयने दिलेल्या माहितीनुसार इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेदरम्यान बुमराहच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली होती. तो अद्याप पूर्णपणे तंदुरुस्त नसल्याने वैद्यकीय सल्ल्यानुसार त्याला श्रीलंका दौऱ्यातून विश्रांती देण्यात आली आहे.

आता बुमराहच्या जागी संघात संधी मिळाल्यावर नबीला भारतीय संघाकडून पदार्पणाची संधी मिळेल, अशी अपेक्षा आहे. बुमराहची उणीव भरून काढण्याची मोठी जबाबदारी त्याच्यावर असेल.

भारत आणि श्रीलंका यांच्यातील पहिला कसोटी सामना १५ ते १९ ऑगस्टदरम्यान गॉल येथे खेळवला जाणार आहे. दुसरा कसोटी सामना २३ ते २७ ऑगस्टदरम्यान कोलंबो येथे होईल. ही मालिका जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी २०२५-२७ चक्राचा महत्त्वाचा भाग मानली जात आहे.

### अशी आहे कामगिरी

आकिब नबीने मागील दोन रणजी करंडक हंगामात दमदार कामगिरी करत १०४ विकेट्स घेतल्या आहेत. २०२५-२६ रणजी हंगामात त्याने ६० विकेट्स घेत जम्मू-काश्मीरच्या पहिल्या रणजी ट्रॉफी विजेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावली होती. फलंदाजीमध्येही योगदान देण्याची क्षमता या खेळाडूकडे असून त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये दोन अर्धशतकांसह ९९९ धावा केल्या आहेत.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये खास छाप सोडल्यानंतर नबीने भारत 'अ' संघासोबत श्रीलंका दौरा केला. या दौऱ्यात त्याने सहा विकेट्स घेतल्या होत्या. याच कामगिरीमुळे आता त्याला वरिष्ठ भारतीय संघात पदार्पणाची संधी मिळाली आहे.

# एमआय लंडन संघ द हंड्रेड स्पर्धेत विजेता



**लंडन : वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्सचं सख्खे भावंड असलेल्या एमआय लंडनने इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या द हंड्रेड स्पर्धेच्या जेतेपदावर कब्जा केला. या यशासह मुंबईच्या ताफ्यात आता तब्बल १४ जेतेपदे आहेत.

टी-२०चे छोटे प्रारूप असणाऱ्या द हंड्रेड स्पर्धेत आता मुंबईचे नाव दुमदुमले आहे. द ओव्हल इथे झालेल्या फायनलमध्ये एमआय लंडन संघाने १८३ धावांची मजल मारली. विल जॅक्सने ३१ चेंडूत तीन चौकार आणि सहा षटकारांसह ६२ धावांची खेळी केली. निकोलस पूरनने २८ चेंडूत ५४ धावा करत जॅक्सला चांगली साथ दिली. कर्णधार सॅम करनने २३ धावांची उपयुक्त खेळी केली. मँचेस्टर सुपर जायंट्स संघातर्फे जोश टंग आणि नूर अहमद यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

प्रत्युत्तरादाखल मँचेस्टरचा डाव १३८ धावांतच आटोपला. कर्णधार एडन मारक्रमने सर्वाधिक ५० धावांची खेळी केली. मारक्रमचा अपवाद वगळता मँचेस्टरच्या बाकी फलंदाजांनी शरणागती पत्करली. एमआय संघातर्फे रशीद खानने १७ धावांच्या मोबदल्यात पाच विकेट्स पटकावल्या. त्यालाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

# ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा शानदार समारोप

## २०३० स्पर्धेची धुरा भारताकडे

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

ग्लासगो येथे पार पडलेल्या २०२६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा रविवारी रात्री समारोप सोहळा पार पडला. या सोहळ्यात २०३०मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा राष्ट्रकुल ध्वज आणि मशाल अधिकृतपणे भारताकडे सुपूर्द करण्यात आली. पुढील स्पर्धेचे यजमानपद अहमदाबादकडे असून आता भारताने शताब्दी वर्षातील या स्पर्धेच्या तयारीला सुरुवात केली आहे.

ध्वज हस्तांतरण सोहळ्यात भारताचे प्रतिनिधित्व ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्रा, भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी.टी. उषा आणि गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांनी केले, तर बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक जिंकलेल्या जस्मिन लँबोरिया यांनी 'परेड ऑफ नेशन्स'मध्ये भारताची ध्वजवाहक म्हणून जबाबदारी पार पाडली.

समारोप सोहळ्यात भारतीय आणि स्कॉटिश संस्कृतीचा सुंदर संगम पाहायला मिळाला. ग्रॅमी पुरस्कार विजेते गायक शंकर महादेवन यांनी आपल्या मुलांसह 'वंदे मातरम...', 'ए वतन...', 'भाग मिल्खा भाग...', 'लहरा दो...', 'सबसे आगे होंगे हिंदुस्तानी...' यांसारखी लोकप्रिय गीते सादर केली. माजी मिस वर्ल्ड मानुषी चिल्लर हिनेही पारंपरिक भारतीय नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. याशिवाय प्रसिद्ध स्कॉटिश बँड 'सिंपल माइंड्स' आणि ऑस्ट्रेलियन गायिका डेल्टा गुडरेम यांच्या सादरीकरणानेही कार्यक्रम रंगतदार झाला.

समारोप सोहळ्यात प्रिन्स एडवर्ड, ड्यूक ऑफ एडिनबर्ग यांनी ग्लासगो २०२६ स्पर्धा अधिकृतपणे संपल्याची घोषणा केली. त्यांनी २०३०मध्ये भारतातील अहमदाबाद येथे होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सर्व सदस्य देशांना निमंत्रण दिले.

यंदाच्या स्पर्धेत भारताने एकूण ३९ पदके जिंकत चौथे स्थान मिळवले. भारतीय खेळाडूंनी १३ सुवर्ण, १७ रौप्य आणि नऊ कांस्यपदके पटकावली. बॉक्सिंगमध्ये भारताने सर्वाधिक १० पदके जिंकली तसेच मीराबाई चानू, अस्मिता डे, हर्ष सिंग, नीरज चोप्रा, गुलवीर सिंग आणि तेजस्विन शंकर यांच्या कामगिरीने भारताची मोहीम संस्मरणीय ठरली.

ग्लासगोतील स्पर्धेचा समारोप झाला असला, तरी आता राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे लक्ष भारताकडे वळले आहे. २०३०मध्ये अहमदाबाद येथे होणाऱ्या स्पर्धेत भारत यजमान म्हणून जगाचे स्वागत करेल.

# स्थानिक सामन्यात अभिषेक शर्माचा धूमधडाका

## ९१ चेंडूंत कुटल्या २३३ धावा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अमृतसर विरुद्ध तरन तारन मेन सिनिअर या स्थानिक सामन्यात भारतीय क्रिकेट टीमचा सलामीवीर अभिषेक शर्मा अमृतसरकडून खेळत आहे. त्याने तरन तारन मेन सिनिअरविरुद्धच्या सामन्यात ९१ चेंडूत २३३ धावा केल्या.

अभिषेकच्या फटकेबाजीमुळे अमृतसर संघाने तरन तारन मेन सिनिअरविरुद्धच्या सामन्यात ५० षटकांत आठ बाद ५३३ धावा केल्या. त्याने २५ षटकार आणि १५ चौकार मारत द्विशतकी खेळी केली. यात फक्त षटकार आणि चौकार मारत २१० धावा केल्या. अभिषेकसोबत सलामीला आलेल्या अभय चौधरीने ८५ चेंडूत दोन षटकार आणि १० चौकारांच्या जोरावर ९३ धावा केल्या.

सलामीवीरांच्या फटकेबाजीला अमृतसर संघातील अभिनव शर्माचीही छान साथ लाभली. अभिनवने ३३ चेंडूत तीन षटकार आणि तीन चौकार मारत ५१ धावा केल्या. वरिंदर सिंहने २९ चेंडूत ३६, सलिल अरोडाने १८ चेंडूत २९, साहिल शर्माने २० चेंडूत ३७, तरनवीर सिंहने १५ चेंडूत २० धावांचे योगदान दिले.

अभिषेक शर्मा मागील काही दिवसांपासून भारतासाठी टी-२० क्रिकेटमध्ये मोठी धावसंख्या उभारण्यात अपयशी ठरले आहेत, पण स्थानिक क्रिकेटमध्ये धावांचा पाऊस पाडत त्यांनी आपल्या क्षमतेची झलक दाखवून दिली. द्विशतकी खेळीमुळे अभिषेक शर्माचा आत्मविश्वास बळावला आहे. यामुळे लवकरच होणार असलेल्या आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये अभिषेककडून उत्तम खेळी होईल, अशी आशा क्रिकेटप्रेमींना आहे.

# एशियन लेजेंड्स लीगमध्ये भारताचा पाकिस्तानवर विजय



**लुसाका : वृत्तसंस्था**

एशियन लेजेंड्स लीग २०२६मधील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हायव्होल्टेज सामन्यात इंडिया रॉयल्सने पाकिस्तान पँथर्सचा दोन गडी राखून पराभव केला. बांगलादेशचा १९ धावांनी पराभव केल्यानंतर शिखर धवनच्या नेतृत्वाखालील इंडिया रॉयल्सचा हा सलग दुसरा विजय असून या विजयासह संघाने गुणतालिकेत अव्वल स्थानी झेप घेतली आहे.

सामन्यात नाणेफेक जिंकून इंडिया रॉयल्सने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तान पँथर्सची सुरुवात अडखळती झाली असली, तरी कर्णधार इम्रान नझीरने २९ चेंडूंत ४७ धावांची स्फोटक खेळी केली. त्याला इब्रार आटा आणि तौफीक उमर यांनी प्रत्येकी ३९ धावांचे योगदान दिले. या खेळींच्या जोरावर पाकिस्तान पँथर्सने निर्धारित २० षटकांत सहा गडी गमावून १६७ धावांपर्यंत मजल मारली. इंडिया रॉयल्सकडून शादाब जकाती आणि सुबोध भाटी यांनी प्रत्येकी दोन, तर ऋषी धवन आणि मनप्रीत सिंग गोणी यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

१६८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंडिया रॉयल्सची सुरुवातही निराशाजनक झाली, मात्र अभिषेक जलोटाच्या १९ चेंडूंत ३० धावा आणि सरुल कंवरच्या २९ चेंडूंत ४६ धावांच्या धुवाधार खेळीने भारतीय संघाचा विजय निश्चित केला. या विजयाचा खरा शिल्पकार ठरला तो अष्टपैलू ऋषी धवन. त्याने ३३ चेंडूंत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ५० धावांची अर्धशतकी खेळी केली. शेवटच्या टप्प्यात अनुनीत सिंगने अवघ्या सहा चेंडूंत नाबाद १६ धावांची वादळी खेळी करत संघाला १७.४ षटकांतच सामना जिंकवून दिला.



**पनवेल : भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून युनिफाईड असोसिएशन रायगडच्या वतीने जिल्हास्तरीय युनिफाईड अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात करण्यात आले होते. या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन खेळाडूंचा उत्साह वाढवला आणि त्यांचे कौतुक केले. यावेळी पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**






# मॅचविनर मोहम्मद अब्बासला दुसऱ्या सामन्यात डच्चू

**गयाना : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा संघ सध्या वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे. मालिकेतील पहिल्या सामन्यात वेस्ट इंडिजने दमदार विजयाची नोंद केली. पाकिस्तानने हा सामना ९० धावांनी गमावला, पण गोलंदाजीत मोहम्मद अब्बासने दमदार गोलंदाजी केली होती. या सामन्यातील दोन्ही डावात मिळून त्याने आठ गडी बाद केले, पण पाकिस्तानच्या कर्णधाराने या गोलंदाजाला पुढच्याच सामन्यात डच्चू दिला आहे.

वेस्ट इंडिज विरुद्ध पाकिस्तान यांच्यात सुरु असलेल्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना त्रिनिदादच्या क्विन्स पार्कच्या मैदानावर सुरु आहे. या सामन्यात वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, तर पाकिस्तानचा संघ प्रथम गोलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला. ज्यावेळी बाबर आझमने पाकिस्तानची प्लेईंग ११ सांगितली, त्यावेळी सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. जो गोलंदाज गेल्या सामन्यात पाकिस्तानसाठी हिरो ठरला होता, त्या मोहम्मद अब्बासला या सामन्यातून डच्चू देण्यात आला आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com